औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक ०७.०३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२७) इतिवृत्त

मंगळवार दिनांक ०७ मार्च २००६ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.काशिनाथ कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली ''जयकवाडी प्रकल्प, पैठण, जिऔरंगाबाद'' येथे सकाळी ११.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) श्री. कावडे साहेबराव राणुबा
(०२) श्री. खान मुजेब मिर आलम खान
(०३) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०४) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०५) सौ.जधव संगिता विठ्ठलराव
(०६) सौ.दलाल लता श्रीनिवास
(०७) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०८) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०९) श्री. बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
(१०) श्री. विसपुते शशांक दामोधर
(११) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

(दिनांक १.३.२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील निर्णयानुसार कार्यक्रम पत्रिका क्र.२६ मधील विषय क्र.२४५ ते २४९)

संवाद :

मा.सभापती : आजच्या बैठकीत स.स.उपस्थित झाले त्यांचे अभिनंदन करून ज्या विषयासंदर्भाने बैठक आयोजित केलेली आहे त्यानुसार चर्चेस सुरूवात करावी.

श्री.रेणुकादास वैद्य : मागील दोन बैठकीत हा विषय चर्चेला आला असतांना मी असा एक मुद्दा मांडला की, दोष दुरूस्ती पध्दतीने आपण लेखा परिक्षण करीत असतो. त्यानुसार दोष दुरूस्तीप्रमाणे अहवाल आमच्यासमोर आलेला नाही. आज्ही आमच्या समोर दुरूस्ती करीत असतांना ज्या लेखापरिक्षण अहवालात दोष दाखविण्यात आलेले आहेत त्या सन १९९९ ते २००४-०५ पर्यंतच्या दुरूस्तीसंदर्भाने खुलासा होणे आवश्यक आहे.

श्री.मुजेब खान : आजच्या सभेमध्ये चर्चेला येणारे विषय म्हणजेमनपातील लेखा परिक्षण यामध्ये सर्व विभागातील लेखापरिक्षण अहवाल आमच्या समोर सादर करीत असतांना असे लिहिले आहे की, या विभागातील लेखापरिक्षणाचे काम पुर्णपणे चांगले झालेले आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे आक्षेप नाही असे नाही. तेव्हा आपण सभेमध्ये कोणत्या प्रकरणावर निर्णय घ्यावा असे वाटते. काही विभागामध्ये लेखा परिक्षण अहवालावरून असे दिसते की, निष्काळजीपणा झालेला आहे आणि केलेली नाही. काही आठवडी बाजर प्रकरणात टेंडर काढून स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेले नाही. तेव्हा मला असे म्हणायचे आहे की, प्रत्येक विभागनिहाय लेखापरिक्षण सविस्तरपणे क्लियर होऊन येत नाही तोपर्यंत निर्णय घेऊ नये. तेव्हा खुलासा व्हावा की, लेखापरिक्षण हे प्रत्येक विभागनिहाय दोषमुक्त होऊन का सादर

होत नाही. आणि सन १९९९ पासुन आजपर्यंत लेखापरिक्षण अहवाल प्रलंबीत राहण्याचे कारण काय? याबाबत चर्चा करावयाची ठरल्यास २/३ दिवस लागण्याची शक्यता आहे. करीता पुन्हा एकदा संबंधीत विभागनिहाय प्रमुखांना २/३ महिण्याचा अवधी देवुन लेखापरिक्षणातील निघालेल्या ऑडीटचे तपासणी करावी नंतरच खुलासासह स्पष्टीकरण द्यावे.

श्री.रविकांत गवळी : सविस्तर अहवाल मुख्य लेखापरिक्षकांनी सभागृहात वाचुन दाखवावा.

मा. सभापती : आजच्या सभेमध्ये स.सदस्य, अधिकारी व पत्रकारांचे शब्द सुमनांनी स्वागत. स.सदस्यांनी ज्या सुचना मांडलेल्या आहेत. सर्वप्रथम विषय क्र.२४५ सन १९९९ ते २००४ पर्यंतच्या लेखापरिक्षण अहवालावर विचार विनिमय करणे. कारण वर्षभरात मनपातील अंदाजपत्रकीय व त्यानुसार जेविविध कामे झालेली आहेत त्यांचे लेखापरिक्षण होणे ही बाब अत्यावश्यक असते. परंतु काही कारणास्तव लेखापरिक्षण हे झालेले नाही. करीता आपल्या समोर लेखापरिक्षण अहवाल आलेला आहे. यावर विचार विनिमय केल्यानंतर सन २००५ च्या लेखापरिक्षण अहवालाचा अभ्यास करणेसाठी अवलोकनार्थ सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने आज ही बैठक लावण्यात आलेली आहे. बैठकीचे उद्दिष्ट स्पष्ट आहे की, अनेक वर्षापासुनचा हा अहवाल राहिलेला आहे. चांगल्या विषयावर चर्चा होऊन त्यावरील निर्णय अपेक्षित आहे आणि म्हणुन मी आज मुख्य लेखापरिक्षक यांना सुचना करतो की, सन १९९९ ते २००२ पर्यंतच्या अहवालची माहिती द्यावी.

मुख्यलेखापरिक्षक : मागील ४-५ वर्षापासून लेखापरिक्षण अहवालाची प्रक्रिया पुर्ण झालेली होती. वेळोवेळी लेखापरिक्षण अहवाल हे मा.स्थायी समिती समोर सादर केलेली आहे. त्यावर सभागृहामध्ये अद्यापपर्यंत चर्चा झालेली नव्हती. तेव्हा यावर चर्चा होणेकरीता जनेवारीच्या १० तारखेला स्थायी समितीमध्ये विषय ठेवलेला होता आणि त्या दिवशी ४ वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल असल्यामुळे साधकबाधक चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की, २८ फेब्रुवारी पर्यंत ज्या काही लेखापरिक्षण अहवालातील त्रुट्या किंवा किरकोळ बाबी दुरूस्त करावयाच्या असतील त्या संबंधीत विभागाने करून अनुपालन अहवाल सादर करावे. त्याअनुषंगाने आपण १ मार्चला बैठकही आयोजित केलेली होती. परंतु मा.सभापती यांचे सुचनेवरून आजची ही सभा आयोजित करण्यात आलेली आहे. यामध्ये एकंदरीत ४ अहवाल सन १९९९-२०००, सन २०००-२००१, सन २००१-२००२, सन २००२-२००३, व २००४-०५ पर्यंतच्या मालमत्ता विषयावर चर्चा करावयाची आहे. फक्त २००४-२००५ मध्ये मालमत्ता विभागासंदर्भाने सध्या स्थितीबाबत चर्चा करावयाची आहे. सन २००४-२००५ च्या लेखापरिक्षण अहवालाबाबत बऱ्याचशा खाते प्रमुखाकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्यापैकी बरेचसे परिच्छेद आपण वगळलेले आहेत. त्या विभागाकडे अनुपालनासाठी सुचना केलेल्या होत्या त्या संबंधीत विभागाने काही प्रमाणात पुर्तता करून अनुपालन अहवाल सादर केल्यानंतर वगळण्यात आलेले आहेत. आपण वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करावी असे अभिप्रेत आहे. प्रथमत: सन १९९९-२००० चा अहवाल हा सन २००१ मध्ये सादर करण्यात आलेला होता. त्यामध्ये एकंदरीत ६० परिच्छेदाचा अंतर्भाव होता. त्यापैकी ३८ परिच्छेद संबंधीत विभागप्रमुख, शाखा प्रमुखाकडून वेळोवेळी परिच्छेद निहाय लेखापरिक्षण अहवाल

प्राप्त झाला. त्यानुसार वगळण्यात आले. आता वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवालाबाबत १० जनेवारीच्या बैठकीतच स.सदस्य व संबंधीत विभाग प्रमुख, शाखा प्रमुख यांना प्रलंबीत प्रकरणाचा गोषवारा दिलेला होता. त्या अनुषंगाने आज किती प्रकरणे प्रलंबीत आहेत आणि आजआपणास काय करावयाचे आहे त्यानुसार सन १९९९-२००० या वित्तीय वर्षामध्ये परिच्छेद निहाय अहवाल जरी दाखल केलेला असला तरी ६० परिच्छेदावरही हे सभागृह चर्चा करण्यास सक्षम आहे. आणि या सभेमध्ये ज्या काही सुचना किंवा कार्यवाही बाबत, दुरूस्तीबाबत निर्णय घ्यावयाचा असेल ते सर्व चर्चेद्वारे सदरील सभागृह सुचवून सर्व साधारण सभेसमोर शिफारस करू शकतो. त्या अनुषंगाने २२ परिच्छेत जरी राहिलेले असले तरी २२ पैकी गेल्या महिण्यात लेखा विभाग, प्रकल्प संचालक, विद्युत विभाग, वगैरेचे जवळपास १५/१७ परिच्छेदचे अनुपालन अहवाल अप्राप्त आहेत. त्यावरील परिच्छेदाचे वाचन करून त्यावरील शिफारसी, दुरूस्ती सूचना असल्यास त्या करता येतील.

सौ.लता दलाल : वगळलेले परिच्छेद आहेत ते कोणत्या वर्षातील आहेत.

मुख्यलेखापरिक्षक : सन १९९९-२००० या वर्षातील आहेत. या वर्षातील २२ परिच्छेद आहेत त्यापैकी लेखा विभागातील ४-५ प्रकरणे असुन ती सर्व अग्रीम स्वरूपातील आहेत. त्यामुळे वसुली होणे आवश्यक आहे.

मा.सभापती : यामध्ये मुख्य लेखापरिक्षक यांनी सांगीतल्याप्रमाणे सन १९९९-२००० या वर्षातील वगळलेले ३८ प्रकरणांची व न वगळलेले २२ परिच्छेद निहाय प्रकरणांची वाचन करून यादी ठेवावी. त्यावर स.सदस्यांनी चर्चा करून सुचना कराव्यात.

सौ.लता दलाल : जे वगळलेले परिच्छेद व न वगळलेले परिच्छेत याची यादी स.सदस्यांना दिलेली आहे काय ?

मा.सभापती : दिलेल्या आहेत, आता सन १९९९-२००० वर वाचन करावे.

<u>विषय क्र.२४५ :</u>

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

<u>संवाद :</u>

मुख्यलेखापरिक्षक : कर्मचारी/ अधिकारी यांचेकडे २०,११,३८४/- एवढी अग्रीम शिल्लक आहे. आजच्या स्थितीला १३/०२/२००६ रोजी अनुपालन सादर झालेले आहे. त्यापैकी १,३४,५९६/- एवढ्या रक्कमेचे समायोजन होणे आहे. (पृष्ठ क्र.४ ते १० मध्ये) सन १९९९-२००० वर्षातील.

मा.सभापती : जवळपास ५-६ वर्षाचा कालावधी लोटलेला आहे. तेव्हा याबाबतचे स्पष्टीकरण मुख्य लेखाधिकारी यांनी विलंबाबाबत द्यावे. तसेच १,३४,५९६/- या रक्कमेबाबत प्रशासनाचे मत मांडावे.

मुख्यलेखाधिकारी : कर्मचारी/ अधिकारी यांना अग्रीम देणे ही निरंतर चालणारी प्रक्रीया आहे. ज्या-ज्या वेळी अत्यावश्यक सेवेसाठी अधिकारी/ कर्मचारी यांना अग्रीमच्या मागणीनुसार अग्रीम मंजूरीनुसार देण्यात येते. तशा वेळी केलेल्या अग्रीमच्या खर्चाबाबत तातडीने समायोजन करणेबाबत प्रशासनामार्फत वेळोवेळी सुचना देत असतो.

सौ.लता दलाल : अग्रीम कर्जआहे की ॲडव्हान्स रक्कम आहे. जुने अग्रीम आलेले नाही. ती अग्रीम १ वर्षासाठी ५ वर्षासाठी किंवा १० वर्षासाठी देण्यात येतो. याबाबतचे नियम काय आहेत.

मुख्यलेखाधिकारी : अशा अग्रीमसाठी कोणताही कालावधी नसतो. परंतु एखाद्या शासकीय कर्मचारी/ अधिकारी यांनी प्रशासकीय कारणास्तव अग्रीम घेतलेली असल्यास त्यांनी नियमाप्रमाणे ९० दिवसाच्या अवधीत संबंधितांनी समायोजन करणे आवश्यक असते. काही वेळेस तातडीचे कार्यक्रमाकरीता मागील समायोजन नाही केले तरी कार्यक्रमाचे नियोजन पाहुन नविन अग्रीम द्यावे लागते. त्यामुळे ही प्रक्रिया निरंतर आहे. आणि कालानुरूप चालत राहणारी आहे. प्रशासनातर्फे वेळोवेळी अग्रीम समायोजनाबाबत सुचना देण्यात येतात. त्यानुसार आजच्या स्थितीत १,३४,५९६/- एवढी रक्कम वसुली करणे शिल्लक आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : सन १९९९-२००० चे अग्रीम रू.२०,११,३८४/- पैकी १,३४,५९६/- एवढी रक्कम शिल्लक आहे. आश्चर्य एवढेच की, गेल्या ५-६ वर्षापासुन आपण अग्रीम रक्कम वेळेपुर्वी वसूल करू शकलो नाही. प्रत्येक समायोजनासाठी विशिष्ट कालावधीत समायोजन होणे आवश्यक असतांनाही वसुली केलेली नाही. तेव्हा याबाबत सविस्तर खुलासा अपेक्षित आहे.

मुख्यलेखाधिकारी : अग्रीम वसुलीची प्रक्रिया काही २/३ महिण्यापासुन चालू नाही तर ती सन १९९९ पासुनची चालू आहे. त्यामुळेच आजपर्यंतची १,३४,५९६/- शिल्लक आहे.

सौ.लता दलाल : सन १९९९-२००० ची जवळपास २० लक्षची शिल्लक रक्कम आहे, असे असतांना गत ५-६ वर्षापर्यंतची रक्कम अजुनही १,३४,५९६/- अशी समायोजन होणेसाठी आहे. तेव्हा ९० दिवसात वसुल झालेली रक्कम नाही काय ? आजपर्यंतची वसुली का झालेली नाही याचा खुलासा द्यावा.

मा.सभापती : मुख्यलेखाधिकारी यांना स्पष्टपणे सुचना देण्यात येतात की, ज्या कर्मचारी/ अधिकारी यांनी अग्रीम घेतलेले आहेत. त्यांनी २० मार्च २००६ पर्यंत अग्रीम समायोजन करून अनुपालन अहवाल मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे सादर करावा. कारण अग्रीम घेतल्यानंतर १० दिवसाच्या अवधीत समायोजन करणेसाठी संबंधीत विभाग प्रमुख/ शाखा प्रमुख यांना स्पष्टपणे सुचना देवून १० दिवसाच्या अवधीतच अग्रीमचे समायोजन होणे आवश्यक असल्याने २० मार्चपर्यंत ती वसूली करून अनुपालन अहवाल सादर करावा. आणि यापुढेही कोणतेही अग्रीम देत असतांना १० दिवसाच्या अवधीत अग्रीम सादर करणे बाबत स्पष्ट सुचना द्याव्यात.

श्री.मुजेब खान : सर्व विभाग निहाय लेखापरिक्षण न होण्याचे कारण काय? वर्षनिहाय लेखापरिक्षण होणे आवश्यक आहे. याबाबत प्रशासनास कोणती अडचण आहे.

मा.सभापती : जे लेखापरिक्षण अहवाल झालेले नाहीत. करीता ४ वर्षाचे एकत्रीत अहवाल आपण चर्चेसाठी घेत आहोत. स.स.श्री.मुजेब आलम खान यांनी सुचना केल्याप्रमाणे प्रशासनाच्या वतीने स्थायी समितीस प्रत्येक वर्षी लेखापरिक्षण अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. दुसरी सुचना अशी आहे की, महानगरपालिकेतील प्रत्येक विभाग निहाय लेखापरिक्षण झालेले आहे काय? या लेखा परिक्षण अहवालात जकात; मालमत्ता कर वगैरे सर्व मनपातील विभाग निहाय

व वर्षनिहाय लेखापरिक्षण अहवाल आहे. त्यावर स.सदस्यांनी चर्चा करून निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री.मुजेब खान : गत स्थायी समितीसमोर लेखापरिक्षण अहवाल अपूर्ण असल्याचे सांगीतले होते. आजच्या सभेतही हीच परिस्थिती दिसत आहे. सन २००५ या वर्षातील अहवाल सुध्दा पूर्णपणे झालेले नाही. तेव्हा आज आपण कोणता निर्णय घेणार तेव्हा २-३ महिण्याचा कालावधी पुन्हा वाढवून द्यावा नंतरच पुर्णपणे अनुपालन अहवाल प्राप्त झाल्यानंतरच निर्णय घ्यावा.

मा.सभापती : सर्व स.सदस्यांना माझी विनंती आहे की, सर्वच प्रकरणात आपण सविस्तर चर्चा करू व आपल्या ज्या काही सूचना आहेत त्यावर कार्यवाही करण्याच्या बाबतीत किंवा सुचना करणेच्या बाबतीत जे-जे निर्णय घ्यावयाचे आहेत ते निर्णय आपल्याला घेता येऊ शकतील आणि आपण सुचना देत असतांना आपल्या सुचनांचा विचार करूनच निर्णय देण्यात येईल. आपण विभाग निहाय लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करू आणि संबंधीत अधिकाऱ्यांना त्याबाबत माहिती विचारण्यात येईल. तद्नंतरच निर्णय घेण्यात येईल. लेखापरिक्षणाचे बाबतीत सन १९९९-२००५ पर्यंतचे प्रत्येक विभाग निहाय जर विषय चर्चेला घेतले तर प्रत्येक वर्षी थोड्याफार फरकाने या बाबी निदर्शनास आलेल्याच आहेत. सन १९९९ ते २००५ पर्यंतचे कमी अधिक फरक असणार आहे. त्यामुळे चर्चा करून अहवालावर निर्णय घेता येईल. त्याचप्रमाणे न वटलेले धनादेश पृष्ठ क्र.५ वर २०००-०१ मध्ये आहे. ११.४८ लाखाचे बाबतीत खुलासा अपेक्षित आहे.

श्री. विनायक पांडे : ज्याचप्रमाणे रू. ४.८१ लाखाचे न वटलेल्या धनादेशाबाबतची सुध्दा माहिती द्यावी. त्याचे अनुपालन अहवाल प्राप्त झालेला नाही.

मा.सभापती : न वटलेल्या धनादेशाबाबतचे कारण मिमांसा संबंधीत विभाग प्रमुख यांनी द्यावी.

मुख्यलेखाधिकारी : सन १९९९-२००० या आर्थिक वर्षामध्ये जे न वटलेले धनादेश आहेत ते मालमत्ता विभाग, महानगरपालिकेचे सर्व झोन कार्यालये, जकात करापोटीचे धनादेश स्विकारले होते ते जमा होतात, त्यानंतर बँकेत न वटल्यामुळे सदरील बँकेकडून धनादेश परत आलेले होते. १९९९-२००० या वर्षातील ११,४८,७३०=०० एवढी रक्कम आहे, पैकी ७.०० लाखाची वसुली झालेली असुन उर्वरीत ४.८१ लाख एवढी रक्कमेबाबत ज्या कारणाने बँकेकडून धनादेश परत आलेला आहे. त्याबाबत संबंधीत विभागास कळविला जते आणि ज्या विभागाने सदरचा धनादेश स्विकारलेला आहे. तो धनादेश परत आल्यानंतर त्याच विभागाने वसूली करणे बाबतची जबाबदारी आहे. हे त्याच वेळी लेखा विभागाद्वारे कळविल्या जते. आपले दायित्व व आपली जबाबदारी त्याच दिवशी असते की, ज्या दिवशी बँकेतून धनादेश परत आलेला आहे. त्याच दिवसापासून संबंधीत विभागाने कार्यवाही करावयास पाहिजे मालमत्ता धारकाकडून ४.८१ लाखाचा जे धनादेश आलेला आहे तो संबंधीतांना कळविणेत आलेले होत्रे परंतु संबंधीतांनी अद्यापही पूर्तता केलेली नसल्यामुळे प्रकरणात वसुली थांबलेली आहे.

श्री.विनायक पांडे : यामधील धनादेश कुठल्या विभागामार्फत प्रलंबीत आहे याची माहिती द्यावी. ज्यांचे धनादेश वटलेले नाहीत, त्यांचेवर काय कार्यवाही केली. गेल्या ५-६ वर्षात विधी विभागाने काय कार्यवाही केली.

मुख्यलेखाधिकारी : सर्वच विभाग आहेत. मालमत्ता विभाग आहे, जकात आहे व झोनचे सातही विभाग आहेत.

सौ.लता दलाल : रू. ४.८१ लाखाच्या धनादेशाचा खुलासा नाही. १३८ प्रमाणे कार्यवाही झाली का? सन १९९९-२००० जे जे धनादेश होते. आज या घडीला ५-६ वर्षाचा कालावधी लोटलेला असुन ज्या विभागाकडील धनादेश वटलेले नव्हते त्या विभागावर प्रशासनाने काय कार्यवाही केली किंवा संबंधीत अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर काही कार्यवाही केली किंवा संबंधीत कर्मचाऱ्यांच्या पगारातून प्रशासनाने कोणती रक्कम कपात केली काय? रू.४.८१ लाखाचे धनादेश न वटल्याने काही हरकत नाही, परत गेले तर गेले अशी भूमिका प्रशासनाने घेतलेली आहे काय? ज्या ज्या विभागाकडील धनादेश न वटता परत आले त्या जकात, मालमत्ता विभाग किंवा झोनमधील संबंधीत विभाग अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर जबाबदारी टाकली काय? संबंधित विभागास कळवून फायदा नाही. नेमकी जबाबदारी टाकून काय कार्यवाही केली याबाबतची माहिती द्यावी.

मा.सभापती : ज्या ज्या विभागामार्फत धनादेश जमा होऊन बँकेतून न वटता परत आलेले आहेत. त्या बाबतची यादी मा.सभापती, स्थायी समिती, मा.आयुक्त व उपआयुक्त (महसुल) यांचेकडे द्यावी आणि ज्या विभागाकडील परत आलेले धनादेश असतील त्या विभाग प्रमुखांना ८ दिवसात धनादेशाची रक्कम जमा करणेच्या सुचना द्याव्यात. त्यावेळेसच्या संबंधीत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रत्यक्षात नोटीस बजवून संपुर्ण धनादेशाची रक्कम कार्यालयात जमा करणेची कार्यवाही मुख्यलेखाधिकारी यांना स्पष्ट सूचना देण्यात येत आहे. सन २००५ पर्यंतचे संपुर्ण धनादेश न वटलेले असतील अशा सर्वच विभागाबाबत वेळोवेळी नोटीसा बजवून कार्यवाही केलेली नसल्यास त्याची पुनरावृत्ती पुन्हा होऊ नये. याची दखल मुख्य लेखाधिकारी यांनी घ्यावी व मनपाच्या तिजेरीत न वटलेल्या धनादेशाची रक्कम जमा होणेबाबतची कार्यवाही आठ दिवसांत करावी व त्याचा अहवाल मा.आयुक्त व उपआयुक्त (महसूल) यांना सादर करावा.

श्री.रेणूकादास वैद्य : सन १९९९-२००० मध्ये पृष्ठ क्र.६ मध्ये एका कर्मचाऱ्याने कर्जफेडीची संचिका गहाळ झालेली आहे अशी नोंद आहे त्या संबंधात खुलासा होणे अपेक्षित आहे.

मुख्यलेखापरिक्षक : १९९९-२००० मध्ये अशी ८ प्रकरणे होती. म्हाडाकडे भरावयाची रक्कम रू.१८,६३९ एवढी होती. परंतु उशिरा भरल्यामुळे रू.३,६०७ दंड लागलेला आहे. का उशिरा भरले हे समजत नाही.

मा.सभापती : सदरील संचिका गहाळ होण्याचे कारण काय? लेखा विभागातील संबंधित असल्यासने सविस्तर खुलासा करावा. दंड भरण्याचे कारण काय?

मुख्यलेखाधिकारी : महानगरपालिकेची त्या त्या वर्षाची आर्थिक स्थिती असेल त्या प्रमाणे कर्जची परतफेड करीत असतो. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहूनच आपण प्रकरण प्रलंबीत ठेवलेले होते, नंतर ते आपण नियमीत भरलेले आहे. त्याच्यानंतरचे अशा प्रकारचे कोणतेही प्रकरण आपल्याकडे प्रलंबीत नाही. संचिका लेखाविभागाकडे उपलब्ध आहे. संचिका गहाळ झालेली नव्हती. लेखा परिक्षण अहवालात नमुद आहे.

सौ.लता दलाल : मुख्य लेखाधिकारी यांनी सांगीतले की, संचिका गहाळ झाली नाही. ती उपलब्ध आहे

श्री.रेणुकादास वैद्य तर मुख्य लेखापरिक्षक यांनी संचिका गहाळ झाली आहे असे म्हटलेले आहे तर नेमके कारण काय?

मा.सभापती : संचिका गहाळ झालेली आहे, असे लेखा परिक्षण अहवालात नमूद आहे. मात्र लेखा विभागात सदरील संचिका उपलब्ध आहे. कदाचित मुख्यलेखापरिक्षकांनी मागितल्या वेळेत संचिका दिलेली नसेल त्यामुळे तसे नमुद केलेले दिसते. तेव्हा उद्याच सदरील संचिका मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे पाठवावी म्हणजे प्रकरणात कार्यवाही होईल.

श्री.शशांक विसपुते : भविष्य निर्वाह निधी बाबत कर्मचाऱ्यांस रक्कम जदा देण्यात आली याबाबत काय कार्यवाही केली.

मुख्यलेखापरिक्षक : त्यावेळी ७५ प्रकरणांत खात्यावर रक्कम जमा नसतांना दिले. त्याची वसुली केल्याचे अनुपालन अहवाल दिलेला आहे.

श्री.शशांक विसपुते : ज्या कर्मचाऱ्यास जदा भविष्य निर्वाह निधी देण्यात आला नंतर ती वसुल केली मात्र संबंधीत कर्मचाऱ्यास जदा रक्कम देणाऱ्या त्या वेळेसच्या जे कुणी कर्मचारी असेल त्यावर आपण काय कार्यवाही केली. कर्तव्यपालनात कसुर केलेला नाही काय? यामध्ये जदा भविष्य निर्वाह निधी देण्याचे कारण काय?

मुख्यलेखाधिकारी : संबंधित त्या वेळेस कार्यरत जे कर्मचारी आहे त्यास कर्तव्यात कसुर केला म्हणुन सक्त ताकिद देण्यात येवुन तशी नोंद सेवापटात घेण्यात येईल. तशी संबंधीताची बदली करणेत आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : सन १९९९-२००० मध्ये पृष्ठ क्र.७ येथे बँक ताळमेळ दिलेला नाही.

मा.सभापती : ज्या ७५ कर्मचारी/ अधिकाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीतील रक्कम ही त्यांची संचिका न पाहताच जदा दिलेली आहे. त्या अधिकारी/ कर्मचारी यांनी केलेली चुक ही अतिशय दुदैवी असून भविष्यात अशा प्रकारची भविष्य निर्वाह निधीबाबत वसुली जरी केलेली असेल तरी यापुढे असे प्रकार घडू नयेत म्हणुन निष्काळजीपणा केल्याबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांवर मुख्यलेखाधिकारी यांनी दखल घेवुन कार्यवाही करावी. पुनरावृत्ती होऊ नये.

मुख्यलेखाधिकारी : याबाबत दैनंदिन बँकेत लेखा ताळमेळ दाखल करण्यात येतो.

मा.सभापती : शिल्लक रक्कम असेल जेव्हा वेगवेगळ्या बँकेत ठेवण्याच्या संदर्भाने आपण जेव्हा निर्णय घेतो. त्यावेळेसची माहिती स्थायी समितीला देणे आवश्यक ठरते. स्थायी समितीला माहिती दिल्याशिवाय इतर बँकेत ठेवी ठेवणे बाबत कार्यवाही करू नये व खाते उघडण्यात येऊ नये असे स्पष्ट सुचना देण्यात येते.

श्री.रेणुकादास वैद्य : पृष्ठ क्र.११,१२ व १३ मध्ये जकातीच्या संदर्भात ६ प्रकरणात सन १९९९-२००० मध्ये कमी जकात घेतलेली आहे. तर मुद्दा क्र. ७ मध्ये आक्षेपार्ह ५ प्रकरणात जदा वसुली केली तेव्हा असे स्पष्ट होते की, अधिकाऱ्यांचे याबाबत नियंत्रण नाही किंवा योग्य पध्दतीची अंमलबजवणी होत नाही. ६ पैकी ५ प्रकरणात जरी वसुली केली तरी १ प्रकरणात वसुली का केली नाही याबाबतचे स्पष्टीकरण द्यावी.

श्री.विनायक पांडे : जकात मधील प्राप्त धनादेशाचे बँकेत न वटलेल्या प्रकरणात आजपर्यंत किती प्रकरणात कार्यवाही केली याचीही माहिती द्यावी.

मा.सभापती : उपआयुक्त (महसुल) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (महसुल) : सन १९९९-२००० व २००२ पर्यंतचे जकात बाबतचे न वटलेल्या धनादेशाबाबत लेखा परिक्षण अहवालात जकात बाबतचा उल्लेख नाही. सन २००२ पर्यंत किती चेक परत आले याची माहिती उपलब्ध नाही. सन २००५ मध्ये धनादेश परत आल्याचे प्रमाण अतिशय नगण्य आहे.

श्री.मुजेब खान : उपआयुक्त (म) या ठिकाणी सांगतात की, जकात विभागाचे न वटलेल्या धनादेशाची माहिती उपलब्ध नाही मग आम्हाला या ठिकाणी का बोलावले ?

सौ.लता दलाल : सन १९९९-२००० मध्ये जकात विभागातील न वटलेल्या धनादेशाची माहिती सादर करणे बाबत सुचना केली असता माहिती उपलब्ध नाही असे सांगीतले. त्या वेळी उपआयुक्त (म) नसतील तरी कागदपत्रे कार्यालयात असतात. त्यामुळे माहिती सांगणे आवश्यक ठरते. माहिती न देणे म्हणजे सभागृहाचा अवमान आहे, असे आम्हाला वाटते. याबाबत दुरूस्ती करावी व २००५ पर्यंतची माहिती घ्यावयाची आहे ती नंतर देण्यात यावी.

मा.सभापती : सन १९९९-२००० ते २००५ पर्यंत जकात विभागाचे जे निगडीत धनादेश न वटलेले आहेत. त्या सर्व प्रकरणांची यादीसह जी रक्कम पाच वर्षापर्यंतची थकीत आहे ती सर्व रक्कम १५ मार्च पर्यंत जकात विभागाने वसुल करावी व त्याबाबतचा अहवाल मा.आयुक्त व मा.सभापती यांचेकडे दाखल करावे. तद्नंतरही धनादेशाची रक्कम वसुल न केल्यास संबंधीतावर कायदेशीर कार्यवाही करावी. अशा सुचना देण्यात येतात. एजन्सीज्नुसार माहिती द्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : जे उल्लेख केलेला आहे त्यामध्ये १३ प्रकरणापैकी एकाही प्रकरणात वसुली करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.१९ मधील मुद्दा क्र.१० मध्ये कमी क्षेत्रफळ दाखवून ५४,०८६/- रू. कमी करणेत आलेले आहे. अतिशय गंभीर अशा नोंदी या अहवालात नमुद केलेल्या आहेत. तेव्हा संबंधीत विभागाकडून सविस्तर खुलासा होणे आवश्यक आहे.

मा.सभापती : करमुल्य निर्धारक व संकलक यांचेकडे निवडणूक विभागाचा कार्यभार असल्यामुळे ते सध्या आलेले नाहीत तेव्हा उपआयुक्त (महसुल) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : सन १९९९-२००० या वर्षातील मालमत्ता कर कमी करणेबाबतची संचिका मागवून ३ दिवसात मा.सभापती यांना अहवाल सादर करणेत येईल.

श्री.विनायक पांडे : सन १९९९-२००० मधील मालमत्ता कमी केल्याचे प्रकरण असुन क्षेत्रफळही कमी केले आहे. आता ५-६ वर्ष झाले आहे आजपर्यंत काहीही झालेले नसतांना आता ३ दिवसात अहवाल काय देणार?

मा.सभापती : ३ दिवसात माहिती देण्यात येईल असे उपआयुक्त (म) यांनी सांगीतले त्यास मान्यता देण्यात येते. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य : मालमत्ता कर वसुली पृष्ठ क्र.१८,१९ व २० ते २३ या मध्ये वेगवेगळे मुद्दे आहेत. पृष्ठ क्र.१९,२० मध्ये पावती पुस्तकच उपलब्ध नाही. तर पृष्ठ क्र.२० ते २३ मध्ये कमी भरणा केलेला आहे. पगारपत्रक व्यवस्थित नाही. हजेरी कमी असतांना जस्तीचे पैसे देण्यात आलेले आहे. यामध्ये गंभीर घोटाळा असण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबतचा खुलासा घ्यावा.

श्री.शशांक विसपुते : पृष्ठ क्र.२५ मुद्दा क्र.२ मध्ये ९०,६८०/- एवढ्याचा अपहार झाल्याचा खुलासा करावा.

मा.सभापती : विभाग क्रमांक ७ -पावती पुस्तक गहाळ होणे अत्यंत गंभीर बाब आहे. जेणे करून नोंद ही पावती पुस्तकात असते. परंतु विभाग क्र.७ मधील अनेक पावती पुस्तके गायब झालेली आहेत. असे स्पष्ट यामध्ये नमुद केलेले आहे. उपआयुक्त (म) यांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी पुस्तकाच्या प्रकरणी गांभीर्य लक्षात घ्यावे, करीता सदरील प्रकरणी किती लाख रूपयाचे गहाळ प्रकरण आहे. याचा संपुर्ण अहवाल आजपर्यंत केलेली कार्यवाही बाबतची टिप्पणी संदर्भाने नमुद करावे.

श्री.मुजेब खान : पावती पुस्तकासंदर्भात स्थायी समिती सभेमध्ये अनेकवेळा चर्चा करणेत आली. बऱ्याच वेळा झोनमध्ये असे काही उदाहरणे आहेत की, मुळ पावती रू.५,५००/- ची दिली जते व दुसरी प्रत जी कार्यालयीन असते त्या प्रतीवर केवळ रू.५००/- असे नमुद असते. म्हणजेरजिस्टरला नोंद फक्त रू.५००/- ची होते. अशी प्रकरणे समोर आणणे आवश्यक ठरते. टॅक्सधारक जे आहे रू.१,२५,०००/- भरणा करतो त्या मुळ पावतीवर आकडे बरोबर लिहीतात मात्र दुसऱ्या प्रतीवर फक्त रू.२५,०००/- राहतात म्हणजे १.०० लाखाची अफरातफर दिसून येते. अशा प्रकारचे पुस्तकात नोंदी घेऊ न पुस्तके गहाळ केली जतात. या संदर्भाने मी मा.आयुक्त यांना अशा प्रकारची कल्पना दिलेली आहे. त्यामुळे पावती पुस्तके जमा करतांना घोळ झालेला आहे. याची चौकशी होणे आवश्यक आहे.

उपआयुक्त (म) : श्री.बी.के.रगडे यांनी झोनमध्ये मालमत्ता विभागाच्या पावती पुस्तकामधून ९०,६८०/- ची रक्कम वसुल करून मनपा फंडात भरलेली नव्हती. सदरील रक्कम कर्मचाऱ्याच्या सेवानिवृत्तीच्या उपदानातून वसुल करण्यात येत आहे. इतर पावती पुस्तका संदर्भात स.स.श्री.मुजेब आलमशा खान यांनी उपस्थित केलेल्या सुचनेवरून अशाप्रकारची पावती पुस्तके लेखा विभागातून लेखा परिक्षण विभागाकडे जमा करण्यात आलेली आहेत. जी पावती पुस्तके आपण संबंधीत विभागास देत असतो. त्याची दैनंदिन नोंद आपण ठेवीत असतो. विशेषत: जकात विभागात माझ्या अखत्यारितील विभागात मुळ पावती ही काही दुकानदारांची आम्ही तपासून वसूली केलेली तेवढी रक्कम मनपा फंडात जमा झालेली आहे की नाही हे ही तपासुन आम्ही पाहात असतो. अशा प्रकारच्या तपासण्या यापुर्वीही केलेल्या आहेत. अनियमितता किंवा त्रुट्या आढळतात त्यावर आपण नियमाप्रमाणे कार्यवाही करतो. मागील ८ डिसेंबरच्या कालावधीत जकात विभागातील कर्मचारी श्री.राहूल पल्लेवार यांना अशाच प्रकरणात निलंबीत करणेत आलेले आहे आणि श्री.अशोक वाकेकर यांची सुध्दा बदली करणेत आलेली आहे.

श्री.मुजेब खान : विभागीय कार्यालयामध्ये आपणास असे लक्षात येईल की, मुळ पावती व दुसरी प्रत यामध्ये बराचसा बदल आपणास दिसून येईल. एखाद्या पावती पुस्तकातील २५ पैकी ५/७ पावत्या या मुळ पावतीत लिहीलेल्या रक्कमेपैकी दुसऱ्या प्रतीत बदल झालेली दिसून येईल. अशा प्रकारचे मी मा.आयुक्त महोदय यांचेकडे पत्रानिशी दिलेले होते. याची चौकशी होणे आवश्यक आहे. परंतु खंत वाटते की, ज्यावेळी तक्रार केली जते मुळ पत्रानिशी ती मा.आयुक्त यांचेमार्फत संबंधीत विभागाकडे तेव्हा सदरील प्रत त्या विभागाकडे मिळत नाही. व त्या विभागाकडे विचारणा केली असल्यास ती मुळ प्रत सापडत नाही व दुसरी एखादी प्रत द्यावे असे सांगतात ही

बाब बरोबर नाही. अशाच प्रकारे जकात विभागासंदर्भात मी लेखी दिलेले असतांनाही संबंधीत अधिकारी म्हणतात पुन्हा एखादी प्रत असल्यास माझ्याकडे द्या. तेव्हा प्रश्न अशा उपस्थित हातो की, जी मुळ प्रत तक्रार म्हणुन दिली जते ती प्रत जते कुठे असे जणीवपुर्वक प्रकरणे केली जतात असे दिसते. त्यावरून शहराचा विकास होणे शक्य नाही असे स्पष्ट होते. तेव्हा चौकशी ही निष्पक्षपणे होणे आवश्यक ठरते.

मा.सभापती : उपआयुक्त (महसुल) यांनी जकात व मालमत्ता विभाग तसेच झोनमधील मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीचे पावती पुस्तकाचे पावत्या आपण उपलब्ध करून देतो आणि ते पुन्हा पावती पुस्तके जमा झालेली नाहीत ज्या विभागांना ती पावती पुस्तके देण्यात आलेली होती, त्या-त्या विभागाकडून ती पावती पुस्तके जमा करण्यात आलेली नाहीत, त्या विभाग प्रमुखांची यादी, पावती पुस्तके क्रमांक व वसूल न झालेली रक्कम या बाबतीतला अहवाल १५ मार्चपुर्वी सभागृहाला देणे आवश्यक आहे. आपण अहवाल न देता या प्रकरणी जी प्रस्तुत कार्यवाही आहे ती नियमास अधीन राहून कार्यवाही करावी. १५ मार्च पर्यंत सदरील अहवाल पुर्णपणे तयार करून मा.आयुक्त व मा.सभापती यांना सादर करणे अपेक्षीत आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : मालमत्ता विभागाचे रेकॉर्ड अतिशय अव्यवस्थित आहे. या विभागाकडे काम फारच मोठ्या प्रमाणात आहे. तेव्हा या विभागाचे संगणकीकरण करावे. सन १९९९-२००० मध्ये लेखापरिक्षण संदर्भात ८-१० पृष्ठे अशी आहेत की, पावत्या गहाळ होणे, रेकॉर्ड व्यवस्थित न ठेवणे अशी प्रकरणे आहेत. तेव्हा संगणकीकरण केल्यास ते रेकॉर्ड व्यवस्थित राहील असे मला वाटते.

मा.सभापती : आपण मनपाचे अर्थसंकल्प पुढील वर्षीसाठी तयार करीत आहोत. त्यामध्ये जे ठळक वैशिष्ट्येची कामे पुढील वर्षीसाठीचे आहेत त्यामध्ये आपल्या सुचनेची अंमलबजवणी करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचणी येतील असे मला वाटत नाही.

श्री.मुजीब खान : वार्ड-क येथील मालमत्ता कर व पाणीपट्टी बाबतचे पावत्या पुस्तकासह रजिस्टर मागवून तपासणी करावी. २००४-०५ च्या वर्षापासुन आजपर्यंतचे पुस्तकातील पाने फाटलेली दिसून येतील व काही पावत्या गायब झालेले दिसतील. तेव्हा आपण रजिस्टर व पावत्या पुस्तकासह मागवून चौकशी करावी. त्यातील पृष्ठे फाटलेली आपल्याला दिसून येतील. याबाबत मी या पत्राद्वारे कळविलेले आहे. संबंधित अधिकाऱ्याकडे चौकशी केली असता त्यांनी म्हटले की, होय काही प्रकरणात अशा प्रकारची चौकशी झालेली आहे. तरीही अद्यापपावेतो कार्यवाही झालेली नाही.

मा.सभापती : स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे महापालिकेतील रेकॉर्ड बाबतीत काही त्रुट्या प्रशासनाच्या झालेल्या आहेत त्या निदर्शनास आणुन दिलेल्या आहेत. त्यास अनुसरून मी सर्व विभाग प्रमुख / शाखा प्रमुखांना सुचना करतो की, जे आपल्या विभागांशी संबंधीत रेकॉर्ड आहे, संबंधीत व लिपिक आहे त्यांचेकडे दप्तर सांभाळण्याची व पुस्तके पावती सांभाळण्याची जबाबदारी आहे. प्रत्येक वर्षाचे स्वतंत्र रेकॉर्ड तयार करून भांडार व अभिलेख विभागाकडे यादीसह दाखल करून घेण्यात यावे. तसेच वर्षाचा संपुर्ण अहवाल तयार करून जमा करण्यात यावे. तांत्रिक विभागाने यादीसह जमा करावे त्या रेकॉर्डमधून एम.बी. काही पाने गहाळ

झाल्यास त्या संबंधीत विभागाची जबाबदारी राहील अशी सुचना आपल्याला देण्यात येते व तसे न झाल्यास संबंधीत अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

श्री.रेणूकादास वैद्य : सन १९९९-२००० या वर्षामध्ये पृष्ठ क्र.२७ ते ३३ वर नगररचना विभागाचे लेखा परिक्षणाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे १,७६,७८२ एवढी रक्कम कमी भरण्यात आलेली आहे. तसेच पृष्ठ क्र.२८ मुद्दा क्र.३ या सर्व प्रकरणात साशंकता अशी आहे की, पी.आर.कार्ड तयार नाही असा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.३३ मध्ये रू.२,७०,०००/- चे चालानच संचिकेत नाही असा उल्लेख आहे. नगररचना विभागामध्ये रेखांकनास मान्यता देत असतांना कमी भरणा करणे त्याचप्रमाणे रेकॉर्डवर नोंद आहे नाही. मनपाची जगा इत्यादी बाबतचा उल्लेख व्यवस्थित नसणे इत्यादी गंभीर बाबीचा उल्लेख करण्यात आलला असुन ज्या ज्या गोष्टी निदर्शनास आलेल्या आहेत. त्याचा अनुपालनाचा अहवाल अतिशय कमी आहे. ही बाब गंभीर असुन या बाबतीतचा सविस्तरपणे खुलासा व्हावा.

मा. सभापती : संबंधीत विभागाचे प्रमुख आहेत. ते परवानगी घेऊन मनपाच्या कामानिमित्त मुंबईला गेले आहेत. त्याची उपअभियंता नगररचनाकार श्री.देशमुख यांनी पृष्ठ क्र.२७ ते ३६ संपुर्ण माहिती देण्यात यावी.

नगररचनाकार : श्री.गोपाल माछर यांचे रेखांकन बाबतचा मुद्दा आहे. यामध्ये ५०% बेटरमेंट हे १९८६ साली भरलेले होते आणि सन १९९४ ला ५०% बेटरमेंट हे प्रचलित दरानुसार भरलेले आहेत (२,७०,००० प्रती हेक्टर प्रमाणे) नंतर एलडीसीची रक्कम रू ६६०० ची आदेश देण्यापुर्वी १००% भरून घेण्यात आलेली आहे. अगोदर रू. २५,०००/- भरलेले होते. ६,६००/- कमी होते. सदरील रक्कम भरून घेण्यात आलेली आहे. नंतर २९५.७० चौ.मी. क्षेत्र जेआहे तेथील रस्ता विकसीत झालेला आहे. तेथील मिळकत भुसंपादनाची जगा ही हस्तांतरीत करून घेतलेली आहे आणि तेथील रस्ता पण विकसीत झालेला आहे. संदर्भ क्र.८ जे आहे चलन दोन दिवसात भरून घेतो असे मला संबंधीत कर्मचाऱ्यांनी सांगीतलेले आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : ज्या-ज्या जगा महापालिकेकडे हस्तांतर झालेल्या आहेत. त्यांची नोंद कुठेही पी.आर.कार्डवर घेतल्या गेलेली नाही.

नगररचनाकार : आता कोणतेही प्रकरण असो जे पर्यंत मुळ मालक पी.आर.कार्डवर नांव लावून आणीत नाहीत तोपर्यंत त्याला मान्यताच देत नाही. याबाबतीत स्वतंत्र कर्मचारी नेमलेला आहे. हस्तांतरणाच्या प्रक्रियेबाबत पी.आर.कार्डवर महानगरपालिकेचे नांव असलेली यादी तयार करून मालमत्ता विभागाला सादर करण्यात येईल. जेवढ्या संचिका रेखांकन मुल्याच्या आधारीत आलेल्या आहेत तेवढ्याही पृष्ठ क्र.३३ वर मुद्दा क्र.९ मध्ये गोपाल माछर यांचा असा आक्षेप आहे की, एकूण १०७० चौ.मी. मनपाकडे हस्तांतरीत करीत असतांना ७७४ चौ.मी. जगा हस्तांतरण करून घेतले. त्यामध्ये खुलासा असा आहे की, या २५५ चौ.मी. ला वर उल्लेख आलेला होता. त्याचे क्षेत्र बांधकाम परवाना वेळी हस्तांतरण करून घेतलेले आहे. जे क्षेत्र आहे ते प्राथमिक शाळेसाठीचे क्षेत्र आहे. जशी ती भूसंपादन करू त्यावेळी ते मिळेल. सध्या तरी त्या मालकाने करून दिलेली नाही. उर्वरीत आरक्षणाखाली दोन एकरची जगा आहे. आरक्षण आपण ताब्यात न घेतल्याने जगा

ताब्यात नाही. संबंधीताने जगा भुसंपादन करणेसाठी नोटीस सूध्दा दिलेली नाही. गेल्या ३ वर्षापासून पध्दत सूरू केलेली आहे की, पी.आर.कार्ड शिवाय मंजूरीच द्यायची नाही. जेवढे ले-आऊट आहेत तेवढे सुध्दा अशाच पध्दतीने आपण करतो हे प्रकरण मागचे असून नविन प्रमाणे कार्यवाही सुरू आहे.

मा.सभापती : नगररचना विभागाने ज्या डी.पी.प्लॅन व विकास आराखड्यामध्ये मनपाचे आरक्षण क्रिडांगण, रस्ते, गार्डन, दवाखाने, शाळा इत्यादी साठी ज्या काही बाधीत होणारी जगा आहे. त्याबाबतीत आरक्षीत केलेले असतांना देखील वास्तविक नगररचना विभागाच्या मार्फत त्या संपुर्ण मालमत्तेची यादी प्रसिध्द होणे आवश्यक आहे. आता सर्व स.सदस्यांच्या सुचना लक्षात घेता स्पष्ट असे आदेश देण्यात येतात की, आपल्या विभागामार्फत संपुर्ण जेवढे आरक्षण आहे त्या आरक्षणाची यादी प्रसिध्द करण्यात यावी. जेणे करून जमीन मालक, जमीन घेणारा ग्राहक यांनी आरक्षण असलेल्या जगेवर कुठल्याही प्रकारचे बांधकाम अथवा विक्री करून जगा ताब्यात घेणार नाहीत. जर केली तर ती संबंधीत मालकाची, बिल्डरची किंवा घेणाऱ्या धारकाची जबाबदारी राहील. त्यावर महानगरपालिका कार्यवाही करेल. ती सर्व जबाबदारी मालकाची राहील असे नमुद करावे. तसेच यापुर्वी जे पी.आर.कार्ड वसंत भूवनचे बनलेले नव्हते परंतु कालपर्यंत काय झाले आज पर्यंत आपण जे जे रेखांकन मंजूर करणार आहोत ती संपुर्ण प्रॉपर्टी मनपाच्या मालकीच्या हस्तांतरीत होणे आवश्यक आहे व तशी नोंद महानगरपालिकेत झाल्याशिवाय कुठल्याही प्रकारे परवानगी दिली जवू नये. जर तशा प्रकारचे प्रकरण उघडकीस आल्यास संबंधीत अधिकाऱ्यावर विना चौकशीची कार्यवाही करण्यात येईल, अशी नोंद इतिवृत्तांतात घेण्यात यावी. अशा प्रकारचे कामकाज चालेल. नगररचना विभाग हा अत्यंत महत्वाचा व नियोजनाचा विभाग आहे. औरंगाबाद शहर हे अत्यंत झपाट्याने वाढत आहे. या शहराचा पर्यटन स्थळ म्हणुन नावलौकिक करावयाचा असेल तर, येथील रस्ते, आरक्षणाच्या जगा या पेक्षा प्रभावी नियोजनबध्द काम व्हावयास पाहिजे होते ते नगररचना विभागामार्फत अनियोजन बध्द काम झालेले आहे. याबाबत मा.आयुक्त यांना उपआयुक्त (महसुल) यांनी स्पष्टपणे अहवाल देण्यात यावा. आपण भुसंपादनाच्या बाबतीत ५.०० कोटीची जी तरतुद करण्यात आलेली होती ती देखील वापरात आणलेली नाही. याचे कारण देण्यात यावे तद्वतच मनपाच्या हद्दीतील १२७ ची नोटीस देवून नंतर कार्यवाही होईल ही पध्दत अत्यंत चुकीची आहे. ही जी पध्दत अवलंबविलेली आहे ती बरोबर नसुन याचे स्पष्ट उल्लेख करतो आणि सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन आपण रस्ते जे असतील ते स्वत:हून ताब्यात घ्यावे त्यांना टी.डी.आर.च्या माध्यमातून एफ.एस.आय. द्यावा त्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही करीत नाही. सदर प्रॉपर्टीधारक गेल्या ६ महिन्यापासुन मा.आयुक्तांच्या दालनाकडे चकरा मारीत आहे. नंतर ते माझ्याकडे आले होते मी त्यांना अशा अशा सुचना केल्या दोन्हीही घ्यावयाची तयार असेल तर आम्ही ती तयारी करतो असे स्पष्ट करतो की, अशा प्रकारच्या सर्व जगा आपण घेतल्या पाहिजे पैसे उपलब्ध करून द्या, एफ.एस.आय. द्या नागरीक आपल्याला सहकार्य करायला तयार आहेत आपण त्यांची मदत घ्या. येणाऱ्या मुलांचे भविष्य आपल्या हातात आहे क्रिडांगण, शाळा येथील आरक्षण टिकविले पाहिजे अशी सुचना मी करतो.

श्री.रेणुकादास वैद्य : कार्यकारी अभियंता (पापु) व (जलनि:सारण) या विभागामार्फत गरज नसतांना गुत्तेदारास जदा देयके अदा करणे, गरजनसतांना वस्तुंची खरेदी करणे, त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.३९ वर पाणीपुरवठा विभाग क्र.२ यांनी नगरसेवकांचा निधी उपलब्ध नसतांना सुध्दा कामे केलेली आहेत. यामध्ये ८५,६१४/- रू. चे रिक्शा स्टँड बांधण्यात आलेले आहे. ९४,४८४/- रू. ची जलवाहीनी टाकण्यात आली. याच पध्दतीने अतिरिक्त शहर अभियंता विभागामार्फत पृष्ठ क्र.४५, ४६ वर उल्लेख आहे ३.९ लाख रू. चे खर्च दाखविण्यात आले आहे. सहकार राज्यमंत्री यांचेकडून रू.२.०० लाख निधी येणार आहे या अपेक्षेनुसार तो निधी काही प्राप्त झाला नाही. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.४७ वर एका व्यक्तीला काम देण्यात आले असा उल्लेख दिसतो. या सगळ्या बाबी अनियमिततेमुळे झाल्याचे दिसते. याबाबतचा स्पष्टपणे खुलासा होणे आवश्यक आहे.

मा.सभापती : अधिक्षक अभियंता तथा शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : अमरप्रित हॉटेलच्या समोर जे आयलॅण्ड तयार केला होता, त्यावेळी सहकार मंत्री यांनी आश्वासन दिले होते की, मी माझ्या निधीतून खर्च देणार आहे. सदरील काम मनपाने करावे त्या अनुषंगाने अंदाजपत्रक वगैरे तयार केले आणि त्याची नोटींग टाकून त्याची टेंडर सुध्दा काढलेले होते. त्यावेळी सहकार मंत्री यांचेकडून त्यांचा निधी प्राप्त झालेला नव्हता आणि टेंडर कॉल करण्यात आल्याने सदरील खर्च महापालिका फंडातून करावा लागला.

श्री.मुजीब खान : शहर अभियंता यांनी सांगीतले की, सहकार राज्यमंत्री यांनी निधी उपलब्ध करून न दिल्यामुळे महापालिका फंडातून खर्च करण्यात आले. नगरसेवकांचा स्वेच्छानिधी उपलब्ध असतांना कामे करीत नाही आणि याठिकाणी निधी उपलब्ध नसतांना सुध्दा कामे करून घेतल्या गेले ही बाब योग्य नाही. या महानगरपालिकेतील अधिकारी केवळ आश्वासना आधारे काम करून देतात. एखादा नगरसेवक अतिशय तातडीने नगरसेवक निधीतून तातडीचे काम करवून घेण्याचे प्रयत्न करीत असतांना मा.आयुक्त, सभापती व लेखा विभागाकडे पळापळ करावे लागते आणि आश्वासनाने कामे करून दिल्या जते ही पध्दत बरोबर नाही, याबाबतचे जबाबदार कोण आहे?

शहर अभियंता : सदरील काम हे ७/८ लाखाचे होते आणि ते कमी पडत असल्यामुळे काम अर्धवट राहीलं, रू.२.०० लाख सहकार राज्यमंत्री यांचेकडून प्राप्त होतील त्याचा पाठपुरावा सुध्दा केला असतांनाही तो आलेला नाही आणि काम अर्धवट राहू नये म्हणुन काम करवून घेतले व महापालिका फंडातून रू.२.०० लाखाचे काम केले.

श्री.मुजीब खान : मागील मंत्रीमंडळ बैठकीचे वेळी रू.२५.०० कोटी देण्याचे आश्वासन दिलेले होते त्यातील किती रक्कम महापालिकेला मिळाली या बाबतची माहिती द्यावी. कारण खासदार, आमदार यांचेकडून निधी उपलब्ध होतो व आश्वासन दिल्या जते. हे शहर आश्वासनाचे असू नये प्रत्यक्षात काम व्हावे. तेव्हा मंत्रीमंडळ बैठकीत ठरल्याप्रमाणे किती निधी आतापर्यंत महापालिकेला प्राप्त झाला. सिडको हस्तांतर झाल्यानंतर किती प्राप्त होईल, याबाबतची माहिती द्यावी.

मा.सभापती : रू. २.०० लाखाचा निधी मा.सहकार राज्यमंत्री यांच्या निधीतून मिळावयास पाहिजे होता तो काही मिळाला नाही. निधी हा रू.२.०० लाखाचा किंवा ४.०० लाखाचा याला काही महत्व नाही. परंतु आपण सदरील बांधकाम करीत असतांना

नियमाप्रमाणे केलेले आहे काय? व परवानगी घेण्यात आलेली आहे काय? असे सभागृहाचे मत आहे. सहकार राज्यमंत्री यांनी आश्वासन देवूनही रू.२.०० लाखाचा निधी उपलब्ध झाला नाही तेव्हा मा.आयुक्त व स्थायी समिती समोर सदरील प्रकरण पुन्हा मंजुरीसाठी का आले नाही. जर सभागृहासमोर हा प्रस्ताव आला असता तर माझ्या मते हा लेखा परिक्षणाचा मुद्दा उपस्थित झाला नसता आणि म्हणुन यांचे काम करीत असतांना पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी संबंधीत विभागाने घ्यावी. दुसरी माहिती मंत्रीमंडळ बैठकीत ठरल्याप्रमाणे रू.२५.०० कोटीचा निधी औरंगाबाद महानगरपालिकेस मिळाला काय? ज्यावेळी मा.मुख्यमंत्री महोदय यांनी सिडको हस्तांतरीत निगडीत असा हा रू.२५.०० कोटीचा निधी हा त्यामध्ये दिलेला होता. सिडको हस्तांतरानंतर रू.१५.००कोटीचा निधी महापालिकेस देणेबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केलेली होती आणि १५.०० कोटीचा धनादेश हा सिडकोच्या माध्यमातून महापालिकेस प्राप्त झालेला आहे. राहिलेले २५.०० कोटी रू. जेकी, रस्ते विकास महामंडळास देणे बाबतचे ऐवजी याबाबत मा.महापौर व सर्व पदाधिकारी मा.मुख्यमंत्री यांचेकडे मागणी करणार आहेत. मा.राज्यमंत्री महोदय यांचे मार्फत दिलासा मिळणार असे अपेक्षित आहे.

सौ. लता दलाल : पृष्ठ क्र.३९ वर पाणीपुरवठा बाबतीत संदर्भ २ मध्ये टी.व्ही.सेंटर येथे रिक्शा स्टॅण्ड ९० हजराचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. प्रशासकीय मान्यतेनंतर ८५,६१४/- चे संबंधीत गुत्तेदारास देण्यात आले तत्पुर्वी सदरील खर्चाची नोंद किर्दमध्ये नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीमध्ये घेतली नसल्याचे निदर्शनास आले. त्याच प्रमाणे उक्त खर्च ज्या नगरसेवकांच्या निधीमधून खर्च करण्यात आले त्या नगरसेवकांच्या निधीत रक्कम शिल्लक नसल्याचे किर्द मध्ये दिसले. त्यामुळे उक्त खर्च कोणत्या लेखाशिर्षात करण्यात आला याचा बोध होत नाही. यामध्ये काम आहे पाणीपुरवठा विभागाचे आणि बांधकाम आहे रिक्शा स्टॅण्डचे, देत आहे नगरसेवक स्वेच्छा निधी आणि तोही निधी शिल्लक नाही. म्हणजेहा खर्चाचा गोंधळ आहे काय हेच समजयला मार्ग नाही. याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे. संबंधीत नगरसेवकांचे नांव सांगावे.

मा.सभापती : अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता: तत्कालिन महापौर स्वत: होते. मुळ मूद्दा असा आहे की, पाणीपुरवठा विभागाने बांधकाम केले. याचा खुलासा असा की, सर्व सिडको परिसरासाठी उपअभियंता (पापू) हे काम करायचे आणि त्याठिकाणी रस्ते, बांधकामासाठी कुणीही अभियंता नसल्यामुळे एकच उपअभियंता असल्यामुळे ते काम करवून घेतलेले आहे आणि सिडको परिसरातील सर्वच काम संबंधीत अभियंता करून घेत असे आणि सदरील काम स्वेच्छा निधीचे होते. नोंदही स्वेच्छा निधीतील खर्चाची घेतलेली होती. मा.श्री.सुदाम सोनवणे माजी महापौर यांनी काम करवून घेतलेले आहे. याबाबतीत संचिका पाहुन दोन दिवसात माहिती सादर करतो.

सौ. लता दलाल : संबंधीत काम हे स्वेच्छा निधीतून झालेले नसून मग कोणत्या हेड मधून केलेले आहे याची माहिती द्यावी. त्यामुळेच लेखा परिक्षणाने आक्षेप घेतलेले आहे. याची जबाबदारी संबंधीत विभागाने घ्यावयाची आहे.

मा.सभापती : पाणीपुरवठा विभागाअंतर्गत टी.व्ही.सेंटर येथे रिक्शा स्टॅण्डचे काम तत्कालीन महापौर यांचे आदेशानुसार करवून घेण्यात आलेले आहे. संबंधीत विभागाने काम

करवून घेत असतांना ज्या नोंदी मान्यता घेवून केल्या असतील तर त्रृट्यांची पुर्तता करून नोंद घेण्यात यावी. यापुढे स्वेच्छानिधी प्राप्त झाल्याशिवाय काम करवून घेवू नये. स्वेच्छा निधीचा दुरूपयोग होवू नये. अशी पुनरावृत्ती होवू नये याची खबरदारी संबंधीत विभागाने घ्यावी.

श्री.रेणूकादास वैद्य : पृष्ठ क्र.५१ ते ५४ मध्ये शिक्षण विभागातील कापड खरेदी केली ते कापड पडून राहीले. त्याबाबतचे शिक्षण अधिकारी व संबंधीत लिपिकावर कार्यवाही अद्यापही झालेली नाही. त्याच प्रमाणे पृष्ठ क्र.५२ वर अतिशय गंभीर बाब आहे. १,०७,११०/- रू. चे शाळेत दाखल न करताच काढुन घेण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे पृष्ठ क्र.५३ मध्ये कसलीही मान्यता न घेता साहित्य खरेदी व शाळेत शिक्षण साहित्य पुरवठा करण्यात आलेला आहे. पृष्ठ क्र.५४ वर ३,३२,५५४/- एवढी रक्कम कसलीही मान्यता न घेता परस्पर खरेदी करून त्याचे देयक सुध्दा अदा करणेत आलेले आहे. याबाबत संबंधीत लिपिकावर कार्यवाही व्हावी. अशा प्रकारे शिक्षण विभागातील सावळा गोंधळ असुन कसलीही मान्यता न घेता देयके अदा करणे ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची होय त्या दृष्टीने कार्यवाही व्हावी. आतापर्यंत कार्यवाही का करण्यात आलेली नाही. याचा खुलासा करणेत यावा.

मा.सभापती : स.सदस्यांनी केलेल्या सुचनेवरून शिक्षण विभागातील फर्निचर व साहित्य खरेदी प्रकरण हे स.नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीतील शिल्लक असलेल्या रक्कमेतूनच खर्च करावा आणि यासाठी प्रशासकीय मान्यतेनंतर स्थायी समितीची मंजुरी नंतरच पुढील कार्यवाही करून साहित्य खरेदी करणे आवश्यक होते. संबंधीत विभागाने मंजुरी न घेताच देयके गुत्तेदारास अदा केलेली असतील ही बाब अतिशय गंभीर आहे. संबंधीत लिपिकास याबाबतीत विचारणा करून कार्यवाही करावी आणि अशा प्रकारच्या चुका किंवा पुनरावृत्ती यापुढे होवू नये याची दखल घेवुन स्वेच्छानिधीचा खर्च करावा. माझी स.सदस्यांना विनंती की, स्वेच्छा निधी हा तातडीच्या कामासाठीच करावा जेणे करून मान्यता मिळू शकेल, अडचणी येणार नाहीत.

श्री.मुजीब खान : सन १९९९-२००० या वर्षातील लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणेत येत आहेत. जुन्या स.सदस्यांनी जे कामे केलीत ती कामे नविन नगरसेवकाने केलेली नाहीत.

मा.सभापती : जुन्या नगरसेवकांमध्ये आज्ही बरेचशे स.सदस्यांचा सहभाग आहे. त्यामुळे काही वाटून घेऊ नये.

श्री.दिलीप गायकवाड : लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे स्वेच्छानिधीतील खर्च करण्यात आलेल्या कामांचे बाबतीत जे-जे विभागातील अधिकारी/ कर्मचारी दोषी असतील त्यांची चौकशी करून कार्यवाही करावी व बैठक संपवावी.

श्री.रविकांत गवळी : पृष्ठ क्र.५६ ते ५९ आस्थापना विभागातील मुद्दा क्र.१ ते ३ मधील सर्व आक्षेप गंभीर स्वरूपाची आहेत. सर्व नियम धाब्यावर बसवून डावलून कार्यवाही झालेली आहे. कारण की, भांडवली खर्चाचे मध्ये नेमणूक करणे आवश्यक आहे असे असतांना सुध्दा जस्तीचे नेमणूक करणेत आलेली आहे.

श्री.दिलीप गायकवाड : सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील पान क्र.५६ ते ६१ वर नमूद आस्थापना विभागाशी संबंधी आक्षेप वगळण्यात यावा. या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता ठरावाच्या तारखेपासून गृहीत धरावी.

मा.सभापती : आस्थापना विषयक बाबीमध्ये आपण संपुर्णपणे चौकशी लावलेली आहे आणि सदरील चौकशी या सात दिवसांचे आंत प्रशासनाकडून मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे चौकशी अधिकारी श्री.फड, करमुल्यनिर्धारक व संकलक यांना तशा सुचना दिलेल्या आहेत. त्यामुळे या सर्व बाबींचा उल्लेख त्यामध्ये येणार आहे.

श्री.रविकांत गवळी : सन १९९९-२००५ या लेखापरिक्षणात सर्वच विभागातील त्रुट्या आढळलेल्या आहेत. त्यामध्ये महापालिकेतील ज्या विभागातील वसुली बाकी आहे. त्यांचेकडून वसुली सक्तीने करणेत यावी. त्यानंतर आस्थापनेवरील किंवा इतर विभागातील ज्या काही त्रुट्या असतील त्या दुरूस्त करून पुन्हा लेखा परिक्षणात सादर कराव्यात.

मा.सभापती : भांडार विभाग हा मुख्य लेखाधिकारी यांचे अखत्यारीत चालतो. त्यांनी नोंद घ्यावी की, जे भांडार विभागात माल उपलब्ध असतो. भांडार विभागात आयात व निर्यातीचे बाबतीत संपुर्णपणे स्टॉक रजिस्टरला नोंद होणे आवश्यक आहे. कदाचित रॉ-मटेरियल जरी असते तरी त्याचीही नोंद घेण्याची आवश्यकता आहे. या पध्दतीने भांडार विभागाने नोंद घ्यावी आणि रजिस्टरला तशी नोंद घ्यावी. त्याचप्रकारे किटकनाशके वगैरेची नोंदही भांडार विभागानेच घ्यावयाची आहेत. त्या नोंदी भांडार विभागाने घेतलेले नाहीत अशी माहिती आहे. याचीही दखल संबंधीत विभागाने घ्यावी आणि आजपर्यंतचे भांडार प्रमुख लेखापाल म्हणुन कार्यरत होते त्यांनी अशा प्रकारच्या नोंदी का घेतलेल्या नाहीत याची माहीती स्थायी समितीस तीन दिवसांच्या आंत देणे आवश्यक आहे. सन १९९९-२००० मध्ये सविस्तर अनुपालन अहवाल सादर झालेले नाही. ६० पैकी ३८ प्रकरणे समोर आलेले आहे. त्या ३८ प्रकरणांमध्ये लेखा विभाग, मालमत्ता विभाग, आस्थापना विभाग, शिक्षण विभाग, करमुल्य निर्धारण विभाग, सर्व विभागीय कार्यालये, भांडार विभाग इत्यादी कडून विविध कामांबाबतचे धनादेश वटलेले नाहीत. ज्याची नोंद घेण्यात आलेली नाही आणि अशा सर्व विभागातील ज्या लेखा परिक्षण आक्षेप व त्रुट्या आहेत त्या सर्व प्रकारच्या त्रुट्या बाबतचा अहवाल २० मार्च २००६ पर्यंत दुर करून सखोल अशी कार्यवाही करून प्रकरणांत पुन्हा अडचणी येणार नाहीत याची संबंधीत विभागाने काळजी घ्यावी. प्रशासनाने त्या सर्व दुरूस्त्या करून त्या दुरूस्त्यासह सन १९९९-२००० या लेखा परिक्षण अहवालास आजच्या बैठकीत दुरूस्ती करून अहवाल प्राप्त होईल याच धर्तीवर मान्यता देण्यात येते.

(आता भोजनासाठी सभा तहकुब करण्यात येते)

(भोजनानंतर सभेला सुरूवात अंदाजे ३.५५ वाजता)

मा.सभापती : सन २०००-२००१ च्या लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणे व मुख्य लेखापरिक्षक यांनी सदरील अहवाल सभागृहासमोर ठेवावा.

मुख्यलेखापरिक्षक : सन २०००-२००१ या वर्षातील विविध विभागाचे एकूण ७५ आक्षेप असुन त्यापैकी १७ परिच्छेदांचे अुनपालन अहवाल प्राप्त झाले आहे. दिनांक १०/०१/२००६ पर्यंत एकुण ५८ परिच्छेदांचे विविध विभागातील अनुपालन अहवाल प्राप्त होणे शिल्लक आहे. या प्रलंबीत आक्षेपाबाबत संबंधीत विभाग प्रमुख यांनाही कळविणेत आलेले आहे. तेव्हा अनुपालन अहवाल प्राप्त न झालेल्या परिच्छेदाबाबत सभागृहात चर्चा करून त्यामधील त्रुट्या किंवा आक्षेपावरील दुरूस्त्यासह शिफारस करून निर्णय घ्यावा.

श्री.विनायक पांडे : न वटलेल्या धनादेशाची रक्कम सन १९९९-२००० अहवालामध्ये होती त्याचप्रमाणे सन २०००-२००१ या वर्षीही वाढत चाललेली आहे. ती सन १९९९-२००० प्रमाणे आदेशित केल्यानुसार वसुली करून घेणे आवश्यक आहे. २,३७,८८५/- एवढी रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

श्री.मुजीब खान : २,३७,८८५/- एवढी रक्कम न वटलेल्या धनादेशाची दाखविलेली आहे ती सन १९९९-२००० या अहवालातील धरून आहे की, एकाच वर्षातील आहे. याबाबतचा खुलासा करावा.

मुख्य लेखापरिक्षक : सन १९९९-२००० ची न वटलेल्या धनादेशाची रक्कम आहे. त्यापैकी काही वसुली होवून राहिलेली शिल्लक रक्कम ही सन २०००-२००१ या वर्षामध्ये समाविष्ठ होत जईल.

मा.सभापती : लेखाविभागामार्फत जी अग्रीम रक्कम कर्मचारी/ अधिकारी यांना अग्रीम स्वरूपात देण्यात आलेली आहे ती रक्कम लेखा विभागाने संबंधीत कर्मचारी/ अधिकारी यांचेकडून तातडीने वसुल करावी. याशिवाय न वटलेल्या धनादेश जे २,३७,८८५/- एवढी शिल्लक आहे ती रक्कम देखील संबंधीत कर्मचाऱ्यास नोटीस बजवून वसुली करण्यात यावी. संबंधीत विभागास तसे कळवावे आणि संबंधीत विभाग प्रमुखावर तशी जबाबदारी टाकली. धनादेश वटले नाही तर विभाग प्रमुखाकडून वसूल केले जईल. वसुली करावी व अशा प्रकारे अग्रीम यापुढे देण्यात येवु नये याची दुसरी खबरदारी लेखा विभागाने घ्यावी. विभाग प्रमुख वसूल करीत नाही तर ती माहिती मा.आयुक्तांना द्यावी. प्रशासकीय कार्यवाही अशी दुरूस्ती करावी.

श्री.मुजीब खान : जकात विभागातील सन २०००-२००१ चे किती चेक शिल्लक आहेत याची माहिती द्यावी.

मुख्य लेखाधिकारी : धनादेश वटलेले नाही असे एकही प्रकरणझालेले नाही.

मा.सभापती : मालमत्ता विभागाच्या बाबतीत ज्यापावत्या फाडलेल्या आहेत त्यातील बाकी असलेली वसुली संबंधीत विभागाकडून करून घेण्यात यावी व तशी जबाबदारी विभाग प्रमुखावर देण्यात यावी. याबाबतची संपुर्ण जबाबदारी ही मुख्य लेखाधिकारी यांचेवर राहील व मुख्यलेखाधिकारी यांनी नाही केले तर पुढील कार्यवाही मा.आयुक्त व उपआयुक्त (म) यांची संयुक्त जबाबदारी राहील. येणाऱ्या ८ दिवसात संपुर्ण थकबाकी जे वसुल करण्याचे बाकी आहे. ती सर्व थकबाकीची जबाबदारी आपल्यावर सोपविण्यात येत आहे. प्रशासकीय पातळीवरून जे करणे शक्य आहे ते करून दाखवावे आता त्यानंतर कुठल्याही प्रकारची येणे बाकी असता कामा नये अशी कार्यवाही करावी असे स्पष्ट निर्देश देण्यात येत आहेत.

श्री.विनायक पांडे : पृष्ठ क्र.९ वर पशुसंवर्धन अधिकारी डॉ.एस.व्ही.रझवी यांना महाराष्ट्र दर्शन अन्वये ४,८००/- रू.अदा केलेले होते. सवलत अनुज्ञेय असतांना २,१२८/- ऐवजी रू.४,८००/- भाडे ही रक्कम अदा केल्याने संबंधीतास २,६७२/- रू. जदा अदा करण्यात आले आहे. याबाबत अनुपालन अजुनही अप्राप्त आहे. सन २०००-२००१ च्या अहवालावर चर्चा करतो आणि अद्यापही कार्यवाही होत नाही.

मुख्य लेखापरिक्षक : दि. २४/०२/०६ ला अनुपालन अहवाल प्राप्त आहे.

मा.सभापती : माहे डिसेंबर २००४ मध्ये रू.३,२२४/- एवढी रक्कम संबंधीत गुत्तेदाराला जदा रक्कम देण्यात आलेली आहे, याचा खुलासा करावा.

मुख्य लेखापरीक्षक : मार्च २००१ च्या देयकाची तपासणी केली रू.११,७३०/- वसूल करावयाचे राहीले होते. दि.२४.२.२००६ ला अनुपालन केले आहे. चालन बघायचे आहे.

श्री.मुजीब खान : गुत्तेदारास जदा पैसे कसे दिल्या जते याची चौकशी व्हावी.

मा.सभापती : संबंधीत गुत्तेदारास जदा पैसे कसे दिल्या गेले याची चौकशी लेखाधिकारी यांनी करावी व संबंधीत कर्मचारी यांनी जे देयक तयार केले त्यास नोटीस बजवून त्यांच्यावर कार्यवाही करावी आणि तसा लेखी खुलासा देण्यात यावा. त्याचप्रमाणे तांत्रिक विभाग प्रमुखांनी सुध्दा एम.बी.रेकॉर्ड करीत असतांना जस्तीचे देयक कामापेक्षा दिल्या गेले तर त्या कर्मचाऱ्याची चौकशी न करता ज्यांनी रेकॉर्ड केले त्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही विभाग प्रमुखांनी प्रस्तावीत करावी, अशी सुचना याठिकाणी देण्यात येते. पुन्हा दुसऱ्या वेळेस पुनरावृत्ती होऊ नये याची काळजी घ्यावी.

सौ.लता दलाल : पृष्ठ क्र.१७,१८ व १९ मधील संदर्भ क्र.८ यामध्ये मालमत्ता कराबाबत रू.१९.८२ लाख मोकळ्या भुखंडावर कर आकारणी करतांना १-४-९९ पासुन २८% दराने त्या ठिकाणी कर आकारण्यात आला या जगेवर क्रमांक असलेली नोटीस बजवण्यात आलेली असुन मात्र दिनांक नमुद करण्यात आलेली नाही. यासंदर्भात संबंधीत मालमत्ता धारकाकडून कागदपत्रे मागविण्यात आले असता अद्यापही कागदपत्रे सादर झालेली नाही. तेव्हा याबाबतचा खुलासा लेखा परिक्षकांनी करावा की, याबाबतचे कागदपत्रे आपल्याकडे आलेली आहे किंवा नाही.

(पृष्ठ क्र.१८ मधील मुद्दा क्र.८ वाचून दाखविला)

मुख्यलेखापरिक्षक : संदर्भ क्र.१,२ वगळता अद्यापही संबंधीत मालमत्ता धारकाने कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दाखल केलेले नाहीत.

मा.सभापती : उपआयुक्त (म) यांनी खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : याबाबत संचिका प्राप्त करून घेवुन १५ दिवसात अनुपालन अहवाल सादर करणेत येईल.

मा.सभापती : उपआयुक्त (म) यांनी मालमत्ता कर कमी-जस्त करणेच्या प्रक्रियेसाठी चौकशी साठी १५ दिवसाचा कालावधी मागितला तो जस्तीचा होतो. तेव्हा ८/१० दिवसात या प्रकरणी अंमलबजवणी व्हावी अशी अपेक्षा आहे आणि आर्थिक वर्षात याबाबत वसुली झाली पाहिजे अगोदरच या प्रकरणी वेळ झालेला असुन पुन्हा सवलत देण्याची आवश्यकता नाही. वसुलीची त्वरीत कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : पृष्ठ क्र.२८ ते ३१ मध्ये निर्देशित केले आहे की, हातगाडी वाल्यांकडून रू.२,२५,०००/-वसूली अद्यापही झालेली नाही याचे कारण काय?

उपआयुक्त (म) : मालमत्ता विभागाचा सन २०००-२००१ या कालावधीमध्ये हातगाडी वसुली संदर्भात ठेका श्री.सुभाष जनार्दन भोसले, रा.वाहेगांव यांना एकुण ४.३५ लाखात देण्यात आलेला होता पैकी संबंधीतांनी २.२५ लाख एवढी रक्कम भरून उर्वरीत प्रलंबीत आहे. संबंधीत ठेकेदार आहे त्याला नोटीस देवुन तामील केले असता सदर व्यक्ती दिलेल्या पत्यावर सापडत नाही. माझी सभागृहाला विनंती की, असे आणखी काही प्रकरणे आहेत की, ज्यामध्ये फौजदारी स्वरूपाची कार्यवाही आहे. एवढे करीत असतांना ही रक्कम जर वसुल झाली नाही तर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार ही रक्कम निर्लेखित

करण्यात यावे. इमारत भाडे संदर्भात जे मुद्दा आहे की, सहा.आयुक्त, अन्न प्रशासन विभाग त्यानंतर नंदकुमार चौथमल, व इतरांकडे जी थकबाकी होती ती सर्व थकबाकी वसुल झालेली आहे. आता यामध्ये फक्त अध्यक्ष सिध्दार्थ उद्यान धोबीघाट यांचेकडे ५७,६००/- एवढी रक्कम थकीत आहे, तर रामसिंग राजपूत, रा.वैजपुर यांना जे दुकान दिलेले होते त्याची अनामत रक्कम जप्त केलेली आहे. संबंधीत व्यक्तीस दुकानाचा ताबाच दिलेला नव्हता. त्यांना भाडे लावू नये असा संबंधीताचा अर्जआहे.

श्री.मुजीब खान : महानगरपालिकेतील विविध प्रकरणात वसुली बाबत क्रिमीनल केसेस् होतील तर असे कधीपर्यंत चालेल. तेव्हा याबाबत तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा.सभापती : उपआयुक्त (म) यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये रक्कम निर्लोखित करण्याचे सुचविलेले आहे. त्याबाबतीत मुख्य लेखापरिक्षक यांनी खुलासा करावा की, असे आपल्याला करता येते का? संबंधीत प्रॉपर्टीधारकाची स्थावर मालमत्ता जिल्हयात कुठे नाही का? त्याची स्थावर मालमत्ता जप्त करण्याबाबत काही कार्यवाही करता येईल का? याबाबतचा सविस्तर अहवाल स्थायीय समितीस सादर करावा. या प्रकरणी जमिनदार कोण कोण आहेत. त्यांचेकडून करारनामा कसा लिहून घेतलेला आहे. या बाबतचा संपुर्ण अहवाल स्थायी समितीसमोर ८ दिवसात ठेवावा त्यानंतरच निर्णय घेण्यात येईल. जेगे करून १५२ या नियमाचा आधार घेवुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होईल असे करू नये, मग असे भरपुर प्रकरणे आपल्यासमोर पुढे चालू येतील.

श्री.विनायक पांडे : पृष्ठ क्र.३० वर जफरगेट आठवडी बाजराचा मुद्दा समोर आलेला आहे. रू.२.३४ लाख रक्कम भरणा केली नसल्याचे स्पष्ट आहे. त्यानंतर १.३४ लाख रक्कम भरलेली आहे. पुन्हा संबंधीताकडे १.०० लाखाची रक्कम शिल्लक आहे. त्यास नियम ८१-सी नुसार नोटीस देवून कार्यवाही प्रस्तावित करण्यात येत असल्याचे मालमत्ता अधिकारी यांनी दि.१५/०३/२००१ अन्वये कळविलेले आहे. त्याच्यानंतर काय कार्यवाही केली. संबंधीतांनी पैसे भरणा केले किंवा नाही याचा अहवालात कुठेही नोंद नाही.

मा.सभापती : सदर प्रकरणी स्वतंत्र चौकशी आपण लावलेली होती. या प्रकरणी चौकशी अहवाल सर्व स.सदस्यांना अवगत झालेला आहे. याबाबत संपुर्ण अहवालावर स्थायी समितीमध्ये चर्चा होवुन सर्वसाधारण सभेपुढे चौकशी अहवाल सादर करण्यास सुचविलेले आहे. फक्त त्या चौकशीमध्ये जफरगेट बाजराची चौकशी अहवाल यामध्ये समाविष्ठ आहे काय? एवढीच माहिती उपआयुक्त (म) यांनी द्यावी.

श्री.मुजीब खान : एखाद्या गुत्तेदाराकडे मागील वर्षीची थकबाकी असतांना पुन्हा दुसऱ्यांदा गुत्ता देण्याचे कारण काय? वसुली न होण्याचे कारण काय?

उपआयुक्त (म) : सन २००२ ते २००५ ची स्वतंत्र चौकशी होत आहे. सन २०००-२००१ मध्ये श्री.अब्दुल सत्तार अब्दुल फत्ते महंमद या गुत्तेदाराकडे १.०० लाख रू. प्रलंबीत आहेत. प्रशासनाने त्याच्यावर जप्तीची नोटीस तामिल केली असता सदर व्यक्ती दिलेल्या पत्यावर रहात नाही तेव्हा यापुर्वी मी सांगीतल्याप्रमाणे फौजदारी केस करण्यात येत आहेत त्यामध्ये या नावाचाही समावेश आहे. स.स.श्री. मुजीब खान यांनी प्रश्न उपस्थित केला की, त्याच व्यक्तीला पुन्हा-पुन्हा का गुत्ता दिला जतो.

तर पुर्वी अशा घटना झालेल्या आहेत. परंतु या वर्षीपासून संपुर्ण खबरदारी घेतलेली आहे. तर मालमत्ता विभागाचे बेबाकी प्रमाणपत्र असल्याशिवाय लेखाविभागाने अभियांत्रिकी विभागाचे कुठलेही देयक देवू नये अशा प्रकारचे पत्र देखील आम्ही दिलेले आहे.

मा.सभापती : यामधील सर्वात महत्वाचा मुद्दा की, प्रत्येक वर्षी लेखा परिक्षण होणे आवश्यक आहे. सर्व विभाग प्रमुखांना सुचना करण्यात येत आहे की, जे गुत्तेदार किंवा जे व्यक्ती महानगरपालिकेचे कुठल्याही विभागाचे देणे जर लागत असेल आणि त्या माध्यमातून काही थकबाकी असल्यास ते करीत असतांना संबंधीत गुत्तेदाराचे कामातील देयकातून वळती करून घेण्यात यावी. आणि ते त्या विभागाकडे ट्रान्सफर करण्यात यावी अशी सुचना सर्व विभाग प्रमुखांना करण्यात येते. जेणे करून वसुली ही मोठ्या प्रमाणात आणि चांगल्या प्रमाणात होवु शकेल. त्याचप्रमाणे संबंधीत गुत्तेदाराने वसुली बाबत सहकार्य किंवा भरणा करीत नसल्यास महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागाची कामे त्यास घेता येणार नाही असे पाबंद करावे. जेपर्यंत तो गुत्तेदार हा 'नाहरकत' प्रमाणपत्र प्रत्येक विभागाकडून आणीत नाही तोपर्यंत त्यास काम देण्यात येवू नये.

श्री.मुजेब खान : अशा गुत्तेदाराचे लायसेंस जप्त करण्याची कार्यवाही करावी.

सौ.लता दलाल : शहर अभियंता विभाग पृष्ठ क्र.३२ मध्ये लोखंड खरेदी बाबतचा मुद्दा आहे त्यामध्ये असे आहे की, सन १९९९-२००० लोखंडी सळया खरेदी बाबत २५.९.९९ चा साठी १३३ मे.टन लोखंड वितरण २५६ मे.टन, मागणी २०० मे.टन, तर प्रस्ताव सुसंगत दिसतो पण त्याऐवजी ३२० मेट्रीक टन लोखंड खरेदी बाबतचा प्रस्ताव आहे. १२० मे.टन जस्त का? २१.५४ लाख निधी अडकून पडला. त्यानुसार लेखापरिक्षकांनी खुलासा करावा की, या संदर्भाने माहिती आलेली आहे काय? (याबाबतची सविस्तर माहिती वाचून दाखवितात)

मा.सभापती : शहर अभियंता यांच्या विभागामार्फत ज्या त्रुट्या आहेत त्याचा खुलासा शहर अभियंता यांनी करावा.

शहर अभियंता : ३२० मेट्रीक टन लोखंड खरेदी केलेले आहे. त्या वर्षामध्ये जेवढ्या काही बिल्डींग किंवा ब्रिजेस् असतील त्याबाबतचे कॅलक्युलेशन एकत्रीत करून ३२० मेट्रीक टन लोखंड खरेदी करण्याचे प्रस्तावीत होते. पुर्वी आपण सिमेंट आणि स्टील हे कार्यालयामार्फत विकत घेत होतो. जस्त क्वॉन्टीटी असली तर नॅचरली भाव कमी असतो संपुर्ण वर्षभरात जेवढ्या इमारतीचे किंवा पुलाचे काम असतील त्याला अंदाजे किंमत काढुन टेंडर मागवितो. त्यावेळेसचे टेंडर मागवून विकत घेतलेले आहेत आणि त्या वर्षातील जेवढी कामे प्रस्तावित होती त्यापैकी काही कामे पुर्ण झाली नसल्यास त्यातील राहिलेले स्टील नंतरच्या काळात वापरतो.

श्री.विनायक पांडे : पृष्ठ क्र.३३ वर १४०.५४ मेट्रीक टन लोखंड शिल्लक होते. ते स्टील काय केले. शेड्यूल बी प्रमाणे वाटप केले हा खुलासा असमाधानकारक आहे.

शहर अभियंता : त्याच्यानंतर जे-जे काम चालू होते. त्यांना लागल्या प्रमाणे देत होतो. शेड्युल 'ब' प्रमाणे नोंद घेवुन लागणाऱ्या कामासाठी स्टील देत गेलो.

मा.सभापती : सन २०००-२००१ च्या वर्षाचा अनुपालन अहवाल आहे. त्याबाबतचे खुलासा आता ५-६ वर्षानंतर देत आहोत. याबाबत संबंधीत विभागास लेखी कळविले आहे काय?

शहर अभियंता : कळविलेले आहे.

श्री.विनायक पांडे : एकाच गुत्तेदाराकडून मटेरियल घेणे बाबत निगोशिएशन केलेले आहे.

मुख्य लेखापरीक्षक : खुलासा केला तो समाधानकारक वाटत नाही.

मा.सभापती : ०१. लोखंड खरेदी प्रकरणांबाबत शहर अभियंता यांनी ३ दिवसात या परिच्छेदात नमुद केल्याप्रमाणे ज्या काही त्रुट्या असतील त्या दुरूस्त करून मुख्य लेखापरिक्षक यांचेकडे अनुपालन अहवाल सादर करावा.

०२. सन २०००-२००१ या वर्षातील जी वसुली बाबतची जबाबदारी विभाग प्रमुखाकडे देण्यात आलेली आहे त्यांचे बाबतीत पुढील कार्यवाही करणे संदर्भात मुख्य लेखाधिकारी, उपआयुक्त (म) आणि मा.आयुक्त यांचेकडे सादर करून अनुपालन अहवालातील त्रुट्या असतील त्या पुर्ण करणेबाबत मुख्य लेखापरिक्षक यांचेकडे सन २०००-२००१ या वर्षाचे सादर करावे. अहवालास मंजुरी देण्यात येते.

मुख्य लेखापरिक्षक : सन २००१-२००२ या वर्षातील विविध विभागांचे एकंदरीत ९९ परिच्छेद होते त्यापैकी ३८ परिच्छेदांचे अनुपालन अहवाल प्राप्त झालेले आहेत व उर्वरीत ६१ परिच्छेदांचे अनुपालन अहवाल अप्राप्त आहेत. त्यानुसार विविध विभागातील प्रलंबीत आकडेवारी वाचून दाखविले.

मा.सभापती : सर्व विभाग प्रमुखांना सुचित करण्यात येते की, आपआपल्या विभागामार्फत जे-जे परिच्छेदांचे अनुपालन अहवाल सादर करणे बाकी आहे. सध्या आपण २००१-२००२ या वर्षासाठीचे लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करीत असतांना गत ४-५ वर्षापासुन प्रलंबीत परिच्छेदाबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी आजपर्यंत काय कार्यवाही केली याबाबत आपल्याला या प्रकरणाबाबत किती महत्व आहे याबाबतचा खुलासा करावा.

उपआयुक्त (म) : जकात विभागाचे एकुण १० परिच्छेद प्रलंबीत आहेत त्यापैकी ज्या मालावर जकात आकारली जते त्या मालावर कमी जकात आकारणे अशा प्रकारची आक्षेप आहेत. जसे की, २५ टक्के ऐवजी १.५ टक्के आकारणे अशी प्रकरणे आहेत. यामध्ये साधारणत: ११ ते ११.५० हजराची रक्कमेचा समावेश आहे. पुर्ण रेकॉर्ड जकात विभागाच्या गोदामात ठेवलेले असुन त्या गोदामात गेल्या ३०-४० वर्षापासूनचे रेकॉर्ड ठेवलेले आहे. यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. परंतु १०,५०० वरची रक्कमेबाबत जी अडकली आहे त्या बाबत बहुतांश रक्कम वसुल केलेली आहे. मालमत्ता विभागात जी एकुण २२ परिच्छेद आहेत. त्या २२ परिच्छेदांपैकी यामध्ये सक्षम प्राधीकरणाची मान्यता न घेणे, मनपाची गाळे रिकामे रहाणे त्याबरोबर काही प्रकरणांच्या संचिका सापडत नाही आणि जी परिच्छेदांची प्रकरणे प्रलंबीत आहेत ती सर्व प्रकरणे अनेक वर्षापासुनची प्रलंबीत असल्याचे दिसते. भारत पेट्रोलियमला दिलेल्या जगेचे प्रकरण हे सन १९३० चे आहे. तर इतर प्रकरणेही सन १९७३, १९८०-८१ चे आहेत. मालमत्ता विभागाचे जुलै-२००५ पासुन संपुर्ण रेकॉर्ड तपासल्यानंतर त्या त्या संचिका आजही त्या विभागात सापडत नाहीत. अशा प्रकारचे आक्षेप त्यामध्ये समावेश आहे. परंतु जी रक्कम बाकी आहे. त्याबाबत मा.सभापती यांनी निर्देश दिल्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे. परंतु जेरेकॉर्ड सापडत नाही. त्याबाबत असलेल्या संचिकेवरून ते रेकॉर्ड कसे रिस्टोअर करता येईल. त्याबाबतची कार्यवाही चालू आहे. काही संचिका या संपुर्ण शोध घेवूनही त्या

सापडत नाही. त्याबाबतचे जेवढे आक्षेप आहेत त्यावर साधारणत: ८-१० दिवसात कार्यवाही करणेत येईल.

मा.सभापती : मालमत्ता विभागाचे संपुर्णत: संगणकीकरण करण्यात यावे व ज्या प्रॉपर्टी आहेत त्याची नोंद त्या ठिकाणी ठेवावी. ही मालमत्ता विभागाच्या बाबतीत अतिशय महत्वाची बाब आहे.

श्री.मुजेब खान : आताच खुलासा सादर करतांना उपआयुक्त (म) यांनी सांगीतले की, कित्येक संचिका सापडत नाहीत याचे कारण काय? कोणते संचिका आहेत.

मा.सभापती : उपआयुक्त (म) हे स्पष्टपणे खुलासा करीत आहेत. परंतु सध्याच्या परिस्थितीत महापालिकेचा आर्थिक फायदा कसा होईल. याबाबत प्रशासनसाने कार्यवाही करावी.

सौ.लता दलाल : क्रांतीचौक सॉ मिल बाबतचा आक्षेप या ठिकाणी आलेला आहे. पृष्ठ क्र.२३ मध्ये सदरची मुळ संचिका नसुन झेरॉक्स संचिका आहे. ज्यांना जगा दिलेल्या आहेत त्यांची नांवे दिलेली आहेत. पाच व्यक्तींची नांवे आहेत ती नांवे वाचून दाखविली त्यांना महापालिकेतर्फे अद्यापही करारनामा करून दिलेला नाही. मुदतवाढ नाही. गंभीर बाब आहे. त्याचा कुठलाही खुलासा स्पष्ट होत नाही. वरील व्यक्तींकडून आपण आजपर्यंत भाडे घेतो किंवा नाही याचाही यात बोध होत नाही. भाडेपट्ट्यावर आहे. ११ महिन्याची नोंद आढळली. दि.१.४.९३ पासून भाड्यात सुधारणा झाली. १०८ महिन्याचे भाडे भरले नाही. रू.१.०८ लाखाची थकबाकी असल्याचे यामध्ये नमुद आहे. त्यावर काय कार्यवाही केली.

मा.सभापती : मालमत्ता विभागाने या बाबत कार्यवाही करणेच्या संदर्भाने गेल्या ४ महिण्यापुर्वीपासुन सुचना केलेल्या होत्या. त्याबाबत आपण काय कार्यवाही केली. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या मालकीचे जे सभागृह आहे ते सभागृह देखील शोधण्याचे आणि जहीर प्रगटन काढण्याचे सभागृहाने आदेशित केलेले होते. आतापर्यंत कार्यवाही आपल्या विभागामार्फत का करण्यात आलेली नाही. याचा खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : संपूर्ण संचिका विधी विभागाच्या विभाग प्रमुखांकडे पाठवल्या. त्यावर काय कार्यवाही झाली ते इतर विभाग प्रमुखास माहित नाही. सभागृहाचे भाड्याचे दर निश्चितीसाठी सभागृहापुढे ठेवले आहे. बऱ्याचशा संचिका सापडत नाही, त्यामुळे कार्यवाही करण्यास अडचणी येत आहेत.

सौ.लता दलाल : १९८८ ची संचिका जगन्नाथ अप्पा वाडकर यांची आहे. भोगवटाधारकांनी अद्यापपर्यंत ९७,०००/- ची रक्कम दोन वर्षांची अद्यापही महापालिका फंडात जमा केलेली नाही. संबंधीताचा अर्ज संचिकेत दिसत नाही. वरील मुद्यांचा खुलासा अद्याप अप्राप्त आहे.

मालमत्ता अधिकारी : संचिका माझ्याकडे नाही.

मा.सभापती : मालमत्ता अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, आपण एक शाखा प्रमुख आहात आणि महापालिकेचे हित पाहाणे आपले कर्तव्य आहे. आणि सभागृहाने ठरविलेल्या मुद्यांबाबतची कोणत्याही प्रकारची कामे व अंमलबजवणी आपण करीत नाही असे स्पष्ट होते. आपल्याला सदर काम करण्यामध्ये स्वारस्य नाही काय? ती जबाबदारी आपली नाही का? महानगरपालिकेची करोडो रूपयांची प्रापर्टी इतर व्यक्तींना देवून त्याचे वसुली संदर्भात कार्यवाही करीत नाही याचा अर्थ

इनडायरेक्टली आपला संबंध कुठेतरी त्या लिज्जर घेणाऱ्या व्यक्तींशी आहे असा होतो. महापालिकेच्या शहरातील ज्या जगा आहेत. त्याबाबत आपण काय कार्यवाही केली. आताच स.स.सौ.लता दलाल यांनी सुचित केल्याप्रमाणे सात जगांबाबत आपण काय कार्यवाही केली. विषयपत्रिका आपल्याकडे आलेली नाही का? जे अधिकारी अशा प्रकारचे सांगुनही वागत नाही, त्वरीत अंमलबजवणी करीत नाहीत, ते जनतेच्या दृष्टीने अतिशय वाईट आहेत. आपल्या घरची प्रॉपर्टी म्हणुन आपण सांभाळली पाहिजे, हे आपणास समजत नाही काय? आपल्या विभागाकडे मुख्य लेखा परिक्षक यांनी सांगीतल्याप्रमाणे २०-२२ परिच्छेदा बाबतचे अनुालन अहवाल का सादर केले नाही. याबाबत असे स्पष्ट होते की, आपण सक्षम नाहीत.

उपआयुक्त (म) : मालमत्ता विभागातील बऱ्याच संचिका या जुन्या असल्याने त्या संचिका सापडत नाहीत. त्यामुळे कार्यवाही करण्यास अडचणी येत आहेत. मालमत्ता विभागाचे अभिलेख अद्यावत करण्यात येत आहे. सन २००१-२००२ च्या अनेक संचिका कार्यवाही संबंधात आहेत. त्या अढळ होत नाही. मागणी रजिष्टरच्या अनुषंगाने व त्याच्या निष्कर्षावर वसूली केली जते. चालन प्रमाणे बँकेत जमा होत नाही. बँकेत कमी जमा होते. चालनची प्रत आमचेकडे नाही. जेपर्यंत पडताळणी होत नाही तोपर्यंत पॅरा बंद होणार नाही.

मा.सभापती : सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील पान क्र.५६ ते ६१ वर नमूद आस्थापना विभागाशी संबंधीत आक्षेप वगळण्यात येतो. सेवेत कायम केलेल्या दुय्यम आवेक्षक, क.अभियंता या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता ठरावाच्या तारखेपासून गृहीत धरावी.

तसेच प्रशासनाला लेखा परीक्षणाचे गांभीर्य असावयास पाहिजे अत्यंत आवश्यक काम आहे. नजरचुकीने उणिवा राहिल्यास त्या चुकांची दुरूस्ती होणे अत्यावश्यक आहे. चुकांची पुनरावृत्ती होऊ नये. लेखा परिक्षणा बाबत दु:खाने सांगावे लागते की, या संदर्भात मुख्य लेखापरीक्षक यांचेशी संपर्क साधलेला नाही. या सर्व बाबींची विभाग प्रमुख, मुख्य लेखाधिकारी, मा.आयुक्त, उप आयुक्त यांनी गांभीर्याने दखल घेवून लेखा परिक्षण उणिवांची पुर्तता करावी. संपूर्ण थकबाकी जमा करून घ्यावी व या आर्थिक वर्षात कोणतेही येणे बाकी राहणार नाही व याच आर्थिक वर्षात त्याचा भरणा करण्यात यावा.

सन २०००-२००१ बाबतच्या लेखा परिक्षण अहवालावर चर्चा करणेत आली व चर्चा करून संबंधीत विभाग प्रमुखास तसेच लेखा विभागास निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे सन २००१-०२ व २००२-०३ या वर्षातील लेखा परिक्षण अहवालाबाबत उपआयुक्त (महसुल), उपआयुक्त (प्रशासन) व सर्व संबंधीत विभागाचे विभाग प्रमुख त्यांचे अखत्यारित असलेले शाखा प्रमुख यांनी ३१ मार्च २००६ पुर्वी सर्व लेखा परिच्छेदांचे आक्षेप व त्यातील दुरूस्त्या करून लेखा परिक्षण विभागाकडे सादर करावे आणि या ३१ मार्चच्या तारखेपर्यंत जर संबंधीत शाखा प्रमुखांनी, विभाग प्रमुखांमार्फत परिच्छेद निहाय जर मुख्य लेखापरिक्षकाकडे दुरूस्त्यासह अहवाल सादर न केल्यास संबंधीतास जबाबदार धरण्यात येईल अशी नोंद घ्यावी आणि दुरूस्ती सुचवून सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यास शिफारीस करण्यास शिफारस करण्यात येते.

ठराव :

सन १९९९-२००० च्या वार्षिक लेखा परीक्षण अहवालावर सभागृहात झालेल्या चेर्चेनुसार सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील पान क्र.५६ ते ६१ वर नमूद मुद्यांबाबत संबंधीत विभागाकडून अनुपालन देण्यात आलेले असल्याने आस्थापना विभागाशी संबंधीत आक्षेप वगळण्यात येतो. तथापी क.अभियंता व दुय्यम आवेक्षक पदावर कायम केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता ठरावाच्या तारखेपासून गृहीत धरण्यात यावी.

तसेच संबंधीत शाखा प्रमुखांनी, विभाग प्रमुखांमार्फत परिच्छेद निहाय दुरूस्त्यासह अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांकडे सादर करावेत. या सुचना व दुरूस्त्यांसह सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालास मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यास शिफारस करण्यात येते.

विषय क्र.२४६ :

सन २०००-२००१ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

ठराव :

सन २०००-२००१ या आर्थिक वर्षातील लेखा परीक्षण अहवालावर सभागृहात सांगोपांग चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, संबंधीत शाखा प्रमुखांनी, विभाग प्रमुखांमार्फत त्यांचे विभागाशी संबंधीत प्रलंबीत असलेल्या परिच्छेदासंबंधीचा परिच्छेद निहाय दुरूस्त्यासह अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांकडे सादर करावेत. या सुचना व दुरूस्त्यांसह सन २०००-२००१ च्या लेखा परीक्षण अहवालास मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यास शिफारस करण्यात येते.

विषय क्र.२४७ :

सन २००१-२००२ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

ठराव :

सन २००१-२००२ या आर्थिक वर्षातील लेखा परीक्षण अहवालावर सभागृहात सांगोपांग चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, संबंधीत शाखा प्रमुखांनी, विभाग प्रमुखांमार्फत त्यांचे विभागाशी संबंधीत प्रलंबीत असलेल्या परिच्छेदासंबंधीचा परिच्छेद निहाय दुरूस्त्यासह अनुपालन अहवाल मुख्य लेखापरिक्षकांकडे सादर करावेत. या सुचना व दुरूस्त्यांसह सन २००१-२००२ च्या लेखा परीक्षण अहवालास मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे सादर करण्यास शिफारस करण्यात येते.

विषय क्र.२४८ :

सन २००२-२००३ व २००३-२००४ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

विषय क्र.२४९ :

सन २००२-०३ ते सन २००४-०५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता विभागाचे लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे.

मा. सभापती : आजची सभा राष्ट्रगिताने संपन्न होईल. विषय क्र.२४८ सन २००२-२००३ व २००३-२००४ च्या लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करणे व २४९ मालमत्ता विभागाचे लेखा परीक्षण अहवालावर विचार विनिमय करण्याकरीता दिनांक १०.३.२००६ रोजी स्थायी समिती सभेचे आयोजन करण्यात यावे.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद